रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २७४
www.ramprahar.com

सोमवार, २२ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## खासदार श्रीरंग बारणे आज भरणार उमेदवारी अर्ज



**पुणे** : मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे सोमवारी (दि. २२) आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यानिमित्ताने महायुतीच्या वतीने जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात येणार आहे. खासदार बारणे हे सोमवारी सकाळी ९.३० वाजता आकुर्डी खंडोबा माळ येथून भव्य मिरवणुकीने पीएमआरडीए कार्यालयापर्यंत जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील. यासाठी महायुतीमधील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. खासदार बारणे हे सन २०१४ आणि २०१९ असे सलग दोनदा लोकसभा निवडणूक जिंकलेले असून यंदा तिसऱ्यांदा निवडून येत विजयाची हॅट्ट्रिक करण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

# अहंकारी, भ्रष्टाचारी नेत्यांची इंडिया आघाडी

## भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांचे टीकास्त्र

**बुलढाणा : प्रतिनिधी**

इंडिया आघाडी म्हणजे अहंकारी नेत्यांची तसेच भ्रष्टाचारी नेत्यांचा बचाव करणारी व त्यांना संरक्षण देणारी आघाडी असल्याची जळजळीत टीका भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी रविवारी (दि.२१) बुलढाणा येथे केली. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाचा नुसताच चौफेर विकास केला नसून देशाच्या राजकारणाची परिभाषा, दिशाच बदलल्याचे गौरवोद्गारही काढले.



बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ जिल्ह्याच्या सीमेवरील वरवंट बकाल येथे भाजप अध्यक्ष नड्डा यांची जाहीर सभा झाली. त्या वेळी ते बोलत होते.

या सभेस मंत्री गुलाबराव पाटील, उमेदवार खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, आमदार संजय कुटे, आकाश फुंडकर, श्वेता महाले, माजी आमदार चैनसुख संचेती, विजयराज शिंदे, धृपदराव सावळे, भाजप जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, रिपाइं आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरहरी गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या भाषणात नड्डा यांनी इंडिया आघाडी, तत्कालीन युपीए सरकार यांच्यावर टीकेची झोड उठवत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात झालेल्या विकासाचा आढावा घेतला. इंडिया आघाडी म्हणजे अहंकारी नेत्यांची व भ्रष्टाचारी नेत्यांची आघाडी आहे. आघाडीतील अनेक नेत्यांवर कारवाई सुरू असून अरविंद केजरीवाल, मनोज सिसोदिया यांच्यासारखे नेते तुरूंगात आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या काळात भ्रष्टाचार, घोटाळे यांना ऊत आला होता. भ्रष्टाचार करा, मलाई खा, मौज करा आणि जनतेला विसरून जा अशी काँग्रेसची कार्यपद्धती राहिली. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाचा चौफेर विकास करीत देशाला जगात मानाचे स्थान मिळवून दिले. पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था केली. त्यांनी देशाच्या राजकारणाची व्याख्या, दिशा बदलून टाकली. राजकारणाची वाटचाल बदलत राजकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविल्याचे प्रतिपादन नड्डा यांनी केले. पंतप्रधान मोदींनी गावखेडी तसेच महिला, गरीब, युवक, दलित-शोषित, शेतकरी यांना राजकारण व विकासाचा केंद्रबिंदू केल्याचेही ते म्हणाले.

पंतप्रधान मोदींसाठी निवडणूक व मतदान म्हणजे मतदारप्रति जबाबदारी, विकासाची गॅरेंटी आहे. २०१९च्या निवडणुकीत मतदारांनी भाजप व मित्र पक्षांना पाठबळ देत स्थिर सरकार आणले. यामुळे कलम ३७०, अयोध्या राम मंदिर, सुशासन, सीएए, ट्रिपल तलाकसारखे धाडसी निर्णय घेता आले, असे सांगून यंदाच्या निवडणुकीमध्ये युतीला पाठबळ देत तिसऱ्यांदा मोदींना पंतप्रधान करण्याचे आवाहन नड्डा यांनी या वेळी केले.

## आमचे बोलणे काँग्रेसवाल्यांना समजत नाही -संजय राऊत



**मुंबई : प्रतिनिधी**

आम्ही काय बोलतो ते काँग्रेसवाल्यांना समजत नाही. इंडिया आघाडीत पंतप्रधानपदासाठी अनेक नेते इच्छुक आहेत. त्यात उद्धव ठाकरेही आहेत, असे विधान ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केले आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत एनडीएकडून नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदाचे चेहरा आहेत, तर इंडिया आघाडीकडून अद्यापही पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण यावर एकमत होऊ शकलेले नाहीत. मध्यंतरी इंडिया आघाडीच्या बैठकीत मल्लिकार्जुन खरगे यांना पंतप्रधानपदाचा उमेदवार करण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला होता, मात्र त्यावर निर्णय होऊ शकला नाही.

प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार राऊत म्हणाले की, राहुल गांधी हे काँग्रेसचे नेते आहेत आणि ते जर पंतप्रधानपदासाठी इच्छुक असतील, तर त्यांचे स्वागत आहे, परंतु पंतप्रधानपदासाठी देशातील अन्य अनेक नेते इच्छुकांच्या रांगेत आहेत. ममता बॅनर्जी आहेत, अखिलेश यादव आहेत, मल्लिकार्जुन खरगे आहेत, उद्धव ठाकरेही आहेत. त्यांच्यासह अनेक चेहरे पंतप्रधानपदासाठी इच्छुक आहेत. कोणाचे नाव घेणे गुन्हा आहे का? आमच्या पक्षनेत्याचे आम्ही नाव घेत असू, तर त्यात चुकीचे काय? यामुळे कुणाला मिरची लागण्याची गरज नाही, असे म्हणत खासदार राऊतांनी काँग्रेसला डिवचले आहे.

## ठाकरे गटाचे प्रचार गीत वादात

### निवडणूक आगोयाने बजावली नोटीस

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाकडून गेल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार गीत प्रदर्शित करण्यात आले होते. या प्रचार गीतातील दोन शब्दांवर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला असून ठाकरे गटाला याबाबत नोटीस बजावली आहे.

महाराष्ट्रासह देशभरात सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सर्व पक्षांकडून आपापला प्रचार सुरू आहे, पण ठाकरे गटाच्या प्रचार गीतामध्ये 'जय भवानी' आणि 'जय शिवाजी' अशा घोषणा आहेत. निवडणूक आयोगाने 'जय भवानी' हा शब्द धार्मिक असल्याने तो काढण्याबाबत ठाकरे गटाला नोटीस बजावली आहे, मात्र उद्धव ठाकरे यांनी आम्ही हा शब्द काढणार नाही. कायदेशीर लढाई लढू, असे रविवारी (दि.२१) घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हटले. त्यामुळे निवडणूक आयोग त्यांच्यावर काय कारवाई करणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.






**पनवेल** : जैन धर्मियांचे श्रद्धास्थान भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त रविवारी शहरात रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर सहभागी झाले होते. या वेळी माजी नगरसेविका नीता माळी, केदार भगत, राजेश बांठिया, मोतीलाल जैन, नितीन मुनोत, शैलेश खैरोतदीया, छतरमंजी मेहता, संजय जैन, पवन सोनी, विनोद बाफना यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याविरोधात गुन्हा

**बंगळुरू** : आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हाऊसिंग सोसायटीत राहणाऱ्या लोकांना मतांच्या बदल्यात पाणी देण्याच्या आश्वासन दिल्यामुळे त्यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, अशी माहिती कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणी अधिक तपास सुरू असून शिवकुमार यांच्यावर कारवाई होऊ शकते.



### मणिपूरमधील ११ केंद्रांवर आज पुन्हा होणार मतदान

**इम्फाळ** : मणिपूरच्या इनर मणिपूर लोकसभा मतदारसंघाच्या जागेवरील ११ मतदान केंद्रांवर सोमवारी (दि.२२) रोजी पुन्हा मतदान होणार आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार इम्फाळ पश्चिम येथील इरोइसेम्बा मतदान केंद्रावर ईव्हीएम मशिनमध्ये बिघाड झाला होता, तर एएनआय या वृत्तसंस्थेने मणिपूरमधील काही मतदान केंद्रांवर हिंसक घटना घडल्याचा दावाही केला होता.

## पेणमध्ये महायुतीची प्रचार रॅली

### खासदार सुनील तटकरेंना विजयी करण्याचे मतदारांना आवाहन

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ आमदार रविशेठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच आमदार अनिकेत तटकरे, भाजप जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत पेणमध्ये प्रचार रॅली काढण्यात आली. या वेळी मतदारांशी संवाद साधून महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्याचे आवाहन करण्यात आले.




या प्रचार रॅलीचा शुभारंभ पेणमधील कोल्हटकर वाडा येथील गणपती मंदिरात श्रीफळ वाढवून करण्यात आला. रॅलीत भाजप जिल्हा चिटणीस मिलिंद पाटील, माजी जि.प. अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, माजी नगरसेवक दीपक गुरव, राष्ट्रवादी काँग्रेस शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, डी. बी. पाटील, तालुकाध्यक्ष दयानंद भगत, दर्शन बाफना, विशाल बाफना, झिशान नाईक, सपना देशमुख, सुदेश संसारे, माजी नगरसेवक देवता साकोस्कर, नलिनी पवार, प्रकाश पाटील, रघुनाथ बोरकर, शहनाज मुजावर, धनश्री समेळ, जनार्दन जाधव, प्रशांत ओक, ललित पाटील, विलास मनोरे, शोमेर पेणकर, विनोद शहा, अजय क्षीरसागर, दिलीप लाड, पांडुरंग जाधव, आनंद जाधव, सुचिता चव्हाण, मुस्कान झटाम, सागर हजारे, सुप्रिया चव्हाण, बाबू पेडामकर, तन्वी हजारे आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ढोल ताशाच्या गजरात ही रॅली बाजारपेठ, खाटीक आळी, खान मोहल्ला, महावीर मार्ग, कोळीवाडा, पेण नाका आदी ठिकाणी फिरविण्यात आली. या वेळी जैन बांधव, मुस्लिम बांधवांनी तसेच पेण कोळीवाडा, विठ्ठल आळी येथे रॅलीचे स्वागत करण्यात आले.

रॅलीच्या माध्यमातून प्रचारपत्रकांचे नागरिकांना वाटप व खासदार सुनील तटकरे यांना पुन्हा विजयी करण्याचे आवाहन केले गेले.

## खंडाळा घाटात वऱ्हाडाची बस आगीत जळून खाक



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

### सर्व प्रवासी सुखरूप

मुंबईकडून पुण्याकडे जाणाऱ्या खासगी प्रवासी बसला द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात रविवारी (दि.२१) मध्यरात्री २च्या सुमारास भीषण आग लागली. आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच बसमधील सर्व ३८ प्रवाशांनी सुखरूपणे बाहेर धाव घेतल्याने मोठी दुर्घटना टळली.

लग्नाचे वऱ्हाड असलेली बस (एमएच ०१-सीआर ८५८५) मुंबईहून सोलापूरला जात होती. द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात या बसला अचानक आग लागल्यावर सर्व प्रवासी सुखरूपपणे बाहेर पडले. सुदैवाने कोणीही व्यक्ती जखमी झालेली नाही.

फायर ब्रिगेड, देवदूत, आयआरबी पेट्रोलिंग, बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणा, खोपोली पोलीस ठाण्याची टीम, अपघातग्रस्तांना मदत करणारी सामाजिक संस्था टीम, डेल्टा फोर्स यांनी तातडीने मदतकार्य केले, तर खोपोली नगर परिषद व परिसरातील खासगी कंपन्यांच्या अग्निशमन दलांनी आग विझविली. यानंतर आगीत नुकसान झालेली बस एका बाजूला घेऊन द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## मुरूड समुद्र किनारी पर्यटकांचे पुनरागमन

**मुरूड : प्रतिनिधी**

शनिवार, रविवार सुट्टीचा योग साधून मोठ्या संख्येने पर्यटक मुरूड समुद्र किनारी आले होते. विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्यानंतर प्रथमच मुरूड व काशीद समुद्र किनारी पर्यटकांची गर्दी दिसून आली.

साधारणतः परीक्षा संपल्यावर काशीद, मुरूड हाऊसफुल्ल होत असते, परंतु यंदा परीक्षा संपून खूप दिवस लोटल्यानंतर येथे गर्दी पहावयास मिळाली. याचे प्रमुख कारण एप्रिल महिन्यातील दोन आठवडे हे उच्चांकी तापमानाचे होते. त्यामुळे पर्यटक फिरावयास बाहेर पडत नव्हते, परंतु सध्या तापमान पुन्हा मूळ पदावर म्हणजेच ३२ ते ३८ डिग्री सेल्सियसवर आल्याने पर्यटक समुद्र किनारी परतले आहेत. पर्यटकांनी समुद्र स्नान, उंट सफारी, वाळूवर चालणाऱ्या गाड्या, घोडेस्वारी आदींचा आनंद लुटला.



## काँग्रेस नेते मुश्ताक अंतुले आज करणार राष्ट्रवादीत प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा दिवंगत नेते बॅ. ए. आर. अंतुले यांचे जावई आणि काँग्रेसचे माजी आमदार मुश्ताक अंतुले सोमवारी (दि. २२) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. त्यांनी स्वतः या वृत्ताला दुजोरा दिला तसेच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष व महायुतीचे रायगडचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनीही याबाबत माहिती दिली.

मुश्ताक अंतुले यांचा पक्षप्रवेश ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेससह इंडिया आघाडीला धक्का मानला जात आहे.





**उलवे नोड : कोंबडभुजे ग्रामस्थांनी सेक्टर २५मध्ये नव्याने बांधलेल्या मंदिरात हनुमान, गणपती, शिवलिंग तसेच बाबदेव गाव चव्हाटा यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात झाला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी माजी जि.प.सदस्य रवींद्र पाटील, भाजप उलवे नोड १चे उपाध्यक्ष शैलेश भगत, सरचिटणीस धीरज ओवळेकर, पंढरीनाथ भगत, हरिश्चंद्र भगत, उपसरपंच सुधाकर पाटील, एकनाथ भगत, गुरूनाथ भगत आदी उपस्थित होते.**

# काँग्रेस अस्थिरतेचे प्रतीक, त्यांच्याकडे उमेदवारही नाहीत

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हल्लाबोल



**जयपूर : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीचा पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी झाले. दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी प्रचारसभा सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि.२१) राजस्थान दौऱ्यावर होते. त्यांनी सभेत बोलताना काँग्रेसवर जोरदार टीका केली.

काँग्रेस हे अस्थिरतेचे प्रतीक आहे. आज काँग्रेसची अवस्था अशी झाली आहे की, त्यांच्याकडे उमेदवारही नाहीत, असे टीकास्त्र पंतप्रधान मोदींनी डागले. या वेळी त्यांना केंद्र सरकारच्या उज्ज्वला गॅस योजना, पीएम आवास यासह विविध योजनांची माहिती दिली.

काँग्रेसच्या काळात सरकार रिमोट कंट्रोलने चालवले जात होते. त्यांचे नाव न घेता त्यांनी सोनिया गांधींवर निशाणा साधला आणि जे निवडणूक जिंकू शकत नाहीत त्यांना राज्यसभेतून विजयी करून वाचवले जात असल्याची टीकाही पंतप्रधान मोदींनी केली. आज देशातील तरुणांना काँग्रेसला तोंड द्यायचे नाही, असे सांगून आपल्या भाषणात पंतप्रधान मोदींनी आपल्या हमीचा पुनरुच्चार केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, राजस्थानची बाजरी जगाच्या कानाकोपऱ्यात गेली पाहिजे. विकसित भारत आणि विकसित राजस्थानचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. भारताला जगातील तिसरी आर्थिक शक्ती बनवायची आहे. 'जल जीवन मिशन' अंतर्गत प्रत्येक घरात नळाला पाणी पोहचवण्याचे काम वेगाने पूर्ण होत आहे. राजस्थानमध्ये मागील गेहलोत सरकारने यातही घोटाळा केला होता, असा आरोपही पंतप्रधान मोदींनी केला.

तुम्हाला प्रत्येक मतदान केंद्र जिंकायचे आहे. भाजपचा झेंडा प्रत्येक बूथवर असावा. लुम्बाराम यांना मत द्या म्हणजे पंतप्रधान मोदींना मत द्या. तुमचे प्रत्येक मत मला मजबूत करेल. आपण लोकशाही साजरी करावी, असे आवाहनही पंतप्रधान मोदींनी या वेळी केले.

# जनतेला समोर ठेवूनच पंतप्रधान मोदींचे कार्य सुरू –आमदार मंदा म्हात्रे

## नमो संवाद कॉर्नर सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद




**नवी मुंबई : बातमीदार**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने छोट्या छोट्या कॉर्नर सभांच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला जावा याकरिता भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार नमो संवाद कॉर्नर सभा आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले होते. याच अनुषंगाने १५१ बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली बेलापूर मंडळातील सीबीडी सेक्टर – ६ मार्केट, शांतीवन सोसायटी व दिवाळे गावातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र या दोन्ही ठिकाणी शनिवारी (दि. २०) नमो संवाद कॉर्नर सभा झाली. जनतेला समोर ठेवूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्य करत आहेत निर्णय घेत आहेत, असे मत आमदार म्हात्रे यांनी व्यक्त केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले कार्य म्हणजे गरीब जनतेकरिता, प्रत्येक पैसा गरीब कल्याणासाठी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गासाठी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थामध्ये १० टक्के आरक्षण, अमृत योजना, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जल जीवन मिशन योजना, वन नेशन वन रेशन कार्ड योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अशा अनेक योजना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब, तळागाळातील जनतेसाठी व शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देशभरातील कोट्यवधी जनतेला दिलासा मिळाल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक विभागातील समस्यांजाणून घेत स्थानिक नागरिकांसोबत संवाद साधला. या वेळी अबकी बार ४०० पार अशा घोषणा दिल्या.

दरम्यान, राज्यभरामध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून छोट्या सभांच्या माध्यमातून आम्ही जनतेपर्यंत पोहचण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईकरिता केलेले विकास कार्य याची प्रचिती पाहता सीबीडी येथील जसमीत तोमर सहित असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, युक्रेनमध्ये शिक्षणासाठी भारतातील विद्यार्थी मोठ्या संख्येने गेले होते.

जवळपास २० हजार विद्यार्थी युक्रेनच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये अडकले होते. या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती. तसेच हे विद्यार्थीदेखील मायदेशी परत येण्यासाठी सरकारकडे मदतीची मागणी करत होते. सर्व विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांची मोदी सरकारकडे एकच विनंती आहे की, भारत सरकारने आमच्या मुलांना मायदेशी परत आणावे. या अनुषंगाने रशिया आणि युक्रेन यांच्या युद्धामुळे युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना भारतात परत आणण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या प्रयत्नांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून ऑपरेशन गंगा नावाची मोहीम सुरू करण्यात करून त्या अंतर्गत युक्रेनमधील भारतीय दुतावास विद्यार्थ्यांच्या सातत्याने संपर्कात राहून त्यांना पुन्हा भारतात आणण्याचे काम मोदी सरकारकडून करण्यात आले, असे महत्त्वपूर्ण काम मोदी सरकारकडून झाल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदा समवेत या वेळी माजी जिल्हाध्यक्ष सी. व्ही. रेड्डी, माजी नगरसेवक अशोक गुरुखे, डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेविका सुरेखा नरबागे, जसप्रीत सिंग, तनसुख जैन, मनूभाई, ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, डॉ. शिरुरकर, सुभाष गायकवाड, संजय ओबेरॉय, रवी ठाकूर, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, मनसेचे बेलापूर विभाग अध्यक्ष भूषण कोळी, शाम कोळी, कुमार कोळी, तुकाराम कोळी, पांडुरंग पाटील, गंगेश कोळी, एकनाथ कोळी, महादेव कोळी, हेमंत कोळी (नाईक), एकविरा महिला मच्छिमार संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते.

# नवीन पनवेलच्या नितेश दहियाचे 'युपीएससी'मध्ये यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमध्ये राहणारा नितेश कुमार दहिया याला युपीएससी परीक्षेत भारतातून ४२५ रँक मिळाली आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



मर्चंट नेव्हीमध्ये इलेक्ट्रिकल ऑफिसर असणारे राजवीर सिंग व सुनीता राणी यांचा मुलगा नितेशने पनवेल ओएनजीसीच्या केंद्रीय विद्यालयातून बारावी केली होती. त्याने बीडीएस आणि एमडीएस नवी मुंबईच्या भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय आणि रुग्णालयातून केले. सद्या तो भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय आणि रुग्णालय येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी करतो. गेल्या पाच वर्षांपासून तो युपीएससी परीक्षा देत होता. दोन वेळा तो मुलाखतीच्या टप्प्यापर्यंत पोहचला होता. अखेर पाचव्या प्रयत्नामध्ये त्याच्या मेहनतीला यश आले असून तो भारतीय रँकमध्ये ४२५वा आला आहे. या बद्दल त्याचे सर्वच स्तरातून कौतुक, अभिनंदन होत आहे.

# रेवती धडकेला शिष्यवृत्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

डिसेंबर २०२३मध्ये राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना एनएमएमएस परीक्षेची मेरिट लिस्ट नुकतीच जाहीर झाली. त्यामध्ये एससी प्रवर्गातून आपल्या नूतन मराठी विद्यालयातील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी रेवती सिद्धलिंग धडके या विद्यार्थिनीने ठाणे जिल्ह्यातील गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक पटकावलेला आहे.

विद्यार्थिनीने घवघवीत यश संपादन केले आहे. उत्कृष्ट मार्गदर्शन केलेल्या शिक्षक वृंद , निलेश सैद, सुनील पाटील, सुजाता मुंढे व लता औटी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच एन. सी. आर. डी. संस्था मुख्य प्रशासकीय अधिकारी अमरजीत खराडे, मुख्याध्यापक, प्रदीप कांबळे, सुनिता नवले, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाकडून तिचे कौतुक होत आहे.

# स्वप्नाली कोळीची शिष्यवृत्तीसाठी निवड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील माध्यमिक मराठी विभागात शिक्षण घेत असलेल्या स्वप्नाली जगन्नाथ कोळी या विद्यार्थिनीची नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप स्कीम एक्झॅमिनेशन या शासकीय स्तरावरून घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून निवड झाली आहे.



निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून प्रतीवर्षी बारा हजार याप्रमाणे पाच वर्षे शिष्यवृत्ती देण्यात येते. माझ्या यशात माझ्या आई–वडिलांचा आणि विद्याभवन शाळेचा खूप मोठा वाटा आहे, असे मत स्वप्नालीने व्यक्त केले.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ तसेच सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी स्वप्नालीचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव

**उरण : वार्ताहर**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती महोत्सव बौध्दजन पंचायत समिती शाखा नं ८४३ व माता रमाई महिला मंडळ उरण बौध्दवाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.



यात १३ एप्रिल रोजी लहान मुलांनची बुगी बुगी कार्यक्रम व १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता बुध्दपुजा व संध्याकाळी भव्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली व १५ एप्रिल रोजी महिला मंडळ साठी प्रवचन १७ एप्रिल रोजी क्रांतीचा वणवा ऑर्केस्ट्रा व १८ एप्रिल रोजी राहुल शिंदे व नंदा नांद्रेकलर लहान मुलांना बक्षिसे देण्यात आली.

उरण पंचायत समिती चे अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, सचिव विजय पवार, उपसचिव रोशन गाढे, खजिनदार अनंत जाधव, उपखजिनदार सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष अखिलेश जाधव, कार्याध्यक्ष हर्षद कांबळे, संदेश वाहक, अजय कवडे, संकेत साळवी, विनोद कांबळे, संतोष कांबळे, विशाल कवडे कुणाल जाधव, आकाश कांबळे, प्रशांत कांबळे, अमर गायकवाड, प्रज्वल वाघमारे, जयेश कांबळे, विश्वनाथ जाधव, साहिल गायकवाड, गौरव गायकवाड, रूपेश कांबळे, हरिश्चंद्र गायकवाड, जितेंद्र मोरे, माता रमाई महिला मंडळ अध्यक्ष सुनिता सपकाळे, उपाध्यक्ष संगिता जाधव, सचिव करुणा भिंगावडे, कविता जाधव व सर्व सभासद यांनी सहकार्य केले आहे.

# कंटेनरमधून मालाची चोरी करणारे ताब्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सतर्क पोलीस अधिकाऱ्यांनी संशयास्पद कंटेनरमधून माल काढताना दोन व्यक्तींना अटक केली आहे. कपडे, चपला बूट, टी–शर्ट काढताना चौकशी करण्यात आली, त्यावेळी आरोपी पळत जात असताना त्यांना पकडून कारवाई करण्यात आली.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सपोनी संदीप पोमन व पथक यांना जुना मुंबई पुणे हायवे वरील रिंकी पॅलेस हॉटेलचे बाजूला संशयास्पदरित्या एका कंटेनरमधून दोन व्यक्ती काही तरी मांल काढत असल्याचे रस्त्यावरून जाताना दिसले व त्यावर संशय आल्याने कंटेनर जवळ जाऊन खात्री केली असताना दोन्ही व्यक्ती कंटेनर बंद करून पळून जात असल्याचे निदर्शनास आल्यावर पाठलाग करून त्यांना पकडून सर्व घटनेची खात्री केली. यात त्यांनी कंटेनर माल (कपडे, चपला, बूट टी– शर्ट) पुणे सनसवाडी येथून मुंबई नेरूळ येथे नेत असताना कंटेनर मधून कंटेनरचे पाठीमागील सीलचे वरील



कोंयडा खोलून कंटेनर मधील २० लाख रुपये किमतीच्या मालापैकी त्यामधील २४ हजार रुपये किमतीच्या मालाची चोरी करताना रंगेहात मिळून आले म्हणून कंपनी मालक व ट्रान्सपोर्ट यांना संपर्क करून पुणे येथून फिर्यादींना बोलावून खालापूर पोलीस ठाणे येथे ४०७, ५११,३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे पुढील अधिक तपास खालापूर पोलीस ठाणे करत आहे.

# कर्जतमध्ये महावीर जयंती उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरांतील जैन बांधवांनी महावीर जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महावीरांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. या वेळी जैन बांधवांनी 'जिओ और जिने दो' च्या घोषणांनी कर्जत शहर दणाणून सोडले होते. जैन बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते.

या मिरवणुकीत चौदा स्वप्नांच्या प्रतिकृतींचे आयोजन करण्यात आले होते. जैन मंदिरापासून निघालेली मिरवणूक बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यावरून छत्री केंद्र मार्गे पुन्हा जैन मंदिराकडे आली. जैन बांधवानी व खास करून लहान मुलांनी नाचून मिरवणुकीची शोभा वाढवली. या मिरवणुकीत घोडेसुद्धा सहभागी करण्यात आले होते.

जैन समाजाचे अध्यक्ष अजित ओसवाल, मोहन ओसवाल, उमेदमल ओसवाल, अशोक ओसवाल, दिनेश जैन, कांतीलाल कांकरिया, रोहित ओसवाल, राकेश परमार, अक्षय ओसवाल, रमेश ओसवाल, प्रकाश ओसवाल, किरण जैन, दिनेश सोलंकी, भरत सोलंकी, अरविंद जैन आदींसह जैन बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्जत पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# अभिनव ज्ञान मंदिरचा माजी विद्यार्थी मेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी राज्य भरातून माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. दिवसभर आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा सर्वांनीच आस्वाद घेतला. संस्था कधीही अडचणीत आली तर आम्हाला हाक मारा असा शब्द माजी विद्यार्थ्यांनी दिला.



प्रमुख पाहुणे नवनीत प्रकाशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश शहा यांच्या हस्ते माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य, कार्याध्यक्ष श्रीराम पुरोहित, सचिव नंदकुमार मणेर, खजिनदार पद्माकर गांगल, निधी संकलन प्रमुख रणजीत जैन, स्नेह मेळाव्याचे कार्याध्यक्ष विजय मोरे, सचिव संजय खडे व्यासपीठावर उपस्थित होते.

सौरभ हिवरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ढोलकी – आदित्य पवार, आर्यन देशमुख तबला, सिंथेसायझर – कृतुजा कर्वे, हार्मोनियम – दिविजा पुरोहित यांनी दिलेल्या संगीत साथीवर आजी माजी विद्यार्थ्यांनी जयोस्तुते..... हे संस्था गीत सादर केले. उपस्थितांचे स्वागत संजय खडे व विजय मोरे यांनी केले. प्रास्ताविक करताना श्रीराम पुरोहित यांनी, 'नावात काय आहे? असे म्हणतात पण खरे तर नावातच सारे काही आहे. याची प्रचिती वेळोवेळी अस्पल्याला येते. 'अभिनव' हे नावच आम्हा सर्वांना प्रेरणादायी आहे. माणूस वाढत वाढत वार्धक्याकडे जातो, मात्र संस्था अधिक अधिक वाढत गेली की ती प्रगल्भ होते. २००२ पासून वेतनेतर अनुदान नाही तरी समाजाच्या आधारामुळे तिची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. ही संस्था ६ जून १९३५ गोठ्यात सुरू झाली तीचे समाजाचे वाढ विकास राखला शिशु मंदिर ते महाविद्यालय असा संस्थेचा आलेख वाढत चालला आहे. व्यक्ती मोठी नाही संस्था मोठी आहे.' असे स्पष्ट केले. यानंतर डॉक्युमेंटरी द्वारे संस्थेचा चढता आलेख सादर करण्यात आला.

यानंतर विविध क्षेत्रात नाव मिळविलेल्या उच्च पदस्थ अधिकारी रवींद्र हजारे, एव्हरेस्ट वीर संतोष दगडे, सुहास आगाशे, निलेश साळोखे, प्रशांत जगताप, डॉ. नितीन आरेकर, दिनेश अडावदकर, कैलास म्हामले, राजेश साळुंखे, सचिन साळोखे, कल्पना कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. तर लता मोडक, अॅड. चंपालाल ओसवाल, रणजीत जैन, विक्रम वैद्य, मंगल परमार, एकनाथ शेलार, संतोष देशमुख, अनुराधा भडसावळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विकास चित्ते, दिलीप गडकरी, विक्रम वैद्य, जान्हवी मुळे, उषा वैद्य, अनुपमा कुलकर्णी आदींनी मनोगते व्यक्त केली.

सुत्रसंचलन दिनेश आडावदकर आणि नितीन आरेकर यांनी केले. विजय मोरे यांनी आभार प्रदर्शन केले. या वेळी कमलाकर वारे, दिलीप पाटील, राजाराम गायकवाड, जनार्दन परांजपे, भक्ती जोशी, मृदुला गडणीस, उमा डोंगरे, अच्युत कोडगिरे, विजय हरिश्चंद्रे, सुभाषचंद्र नातू, पांडुरंग गरवारे, श्रीकांत ओक, रवींद्र खराडे, दिनकर पुराणिक, अनिल जोशी, प्रभाकर करंजकर, प्रकाश परमार, प्रकाश पटवर्धन, सुधीर पोतदार, दिगंबर कांबळे, अरुण गुरव, अशोक थोरवे, अभिषेक सुर्वे आदींसह माजी विद्यार्थी उपस्थित होते.


## निवडक

### विना परवाना दारूची विक्री

**पनवेल :** विना परवाना दारू विक्री करणाऱ्यावर एका महिलेविरोधात खारघर पोलिसांनी कारवाई केली आहे. तालुक्यातील पेठपाडा गावात एक महिला मद्यविक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता गोणीत मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. त्यामुळे तिच्या विरोधात खारघर पोलिसांनी कारवाई करून मद्यसाठा हस्तगत केला आहे.

### जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** बेकायदेशीररीत्या जुगार खेळणाऱ्यांवर खारघर



पोलिसांनी कारवाई केली आहे. तालुक्यातील पापडीचा पाडा, तळोजा येथे जुगार खेळत असताना खारघर पोलिसांनी चौघांवर कारवाई केली. या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून या चार जणांना ताब्यात घेतले, तर चार जण पळून गेले आहेत. त्यांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत.

## लोकसभा निवडणुकीसाठी पोलिसांकडून कोम्बिंग ऑपरेशन

# खारघरमधून १२ परदेशी नागरिक ताब्यात

### १० आफ्रिकन महिलांसह दोन बांगलादेशींचे बेकायदेशीर वास्तव्य

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान खारघर परिसरात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या १२ परदेशी नागरिकांची धरपकड केली. यात १० आफ्रिकन महिला तसेच दोन बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे.

हे सर्व परदेशी नागरिक काही वर्षांपासून या ठिकाणी बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे.



लोकसभा निवडणुकीदरम्यान कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी नवी मुंबई पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशीटर तसेच अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची झाडाझडती सुरू केली आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या भागांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगार व बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. त्यानुसार खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले होते. या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान खारघर सेक्टर– २७ मधील रांजणपाडा भागातील मेट्रो रेसीडेन्सी या इमारतीत काही नायजेरियन नागरिक बेकायदेशीररीत्या राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मेट्रो रेसीडेन्सी इमारतीतील एका फ्लॅटवर छापा मारला असता, फ्लॅटमध्ये १० आफ्रिकन महिला राहत असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी त्या सर्व महिलांकडे पासपोर्ट आणि व्हिजाबाबत चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतातील वास्तव्याबाबतचे कागदपत्रे, तसेच पासपोर्ट, व्हिजा नसल्याचे आढळून आले. तसेच त्यांनी खारघर पोलिसांच्या पथकाने कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान सेक्टर १८ मध्ये गस्त घालत असताना, बालाजी स्वीटसमोर काजल मुख्तार शेख (वय ३६) व नुर इस्लाम लतीफ शेख (वय ४२) हे दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतातील वास्तव्याबाबतचे तसेच पासपोर्ट व व्हिसा आदी कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. अधिक चौकशीत बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

# भीम जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपुर्ण वातावरणात साजरी झाली. जयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन शनिवारी (दि. २०) करण्यात आले होते. त्याअंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या वतीने विचुंबे येथे सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत शिंदे यांच्या भिमगितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नवीन पनवेल सुकापूर आणि देवीचा पाडा येथीही जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, सरपंच प्रमोद भिंगारकर, विचुंबेचे भाजप अध्यक्ष के सी पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी सरपंच बळीराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, ग्रामपंचायत सदस्य अनंत आप्पा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य चेतन सुरते, ग्रामपंचायत सदस्य आनंद गोंधळी, ग्रामपंचायत सदस्य आरती गायकवाड, देवद माजी सरपंच संदीप वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य बि.डी. पाटील, भारतीय जनता पार्टीचे सोशल मीडिया ग्रामीण तालुका अध्यक्ष डी. के. भोईर, महेश भिंगारकर, सोसायटीचे आवास अध्यक्ष मानेसाहेब, ॲड. परेश गायकवाड, पत्रकार शाम साळवी, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र पाटील, रितेश बाबर, मयूर भुजबळ, विनोद साळुंखे, विवेक आढाव, अनिकेत गायकवाड, ॲड. कल्पेश कांबळे, सुजेश कोबडे, ढवळे साहेब, प्रमोद भिंगारकर, प्रभाकर कांबळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले नठालचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, बाबा शुक्ला, लक्ष्मण भाऊ, विजय मोरे, मंगेश दिवाण, रवींद्र कांबळे, शिवाजी भगत, अरुण केणी यांच्यासह पदाधिकारी, सदस्य आणि भिमअनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सुकापूर सरपंच योगिता पाटील यांचा वाढदिवस शनिवारी साजरा करण्यात आला असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमध्ये एका मतदान केंद्राची धुरा महिलांच्या हाती

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीत महिलांच्या मतदानाचा टक्केवारी वाढविण्याचा निर्धार प्रशासनाने केला आहे. ज्या मतदारसंघात महिला मतदारांची संख्या जास्त अशा केंद्रांचे संपूर्ण कंट्रोलिंग महिलांच्या हाती देण्यात आले आहे. पनवेलमध्येही एक वुमन्स पोलिंग बूथ तयार करण्यात येणार आहे.

राज्यात यावेळी ४४० मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत.बुध क्रमांक ३३२ येथे सर्व जबाबदारी महिलाच सांभाळणार आहे. पनवेल तालुक्यात एकूण ५४४ मतदान केंद्र असणार आहेत. यापैकी ३३२ क्रमांकाच्या केंद्राचे नियंत्रण महिलांच्या हाती असणार आहे. केंद्रावर सर्व कर्मचारी महिला पनवेल शहरातील वाजेकर स्कूल केंद्रावर सर्व महिला कर्मचारी कार्यरत असणार आहेत. यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी, पोलिस कर्मचारी यासुद्धा महिलाच असतील, असे नियोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात एकूण ७ वुमन्स पोलिंग बूथ असणार आहेत.

**महिला नियंत्रित मतदान केंद्र स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. महिला नियंत्रित मतदान केंद्रावर अधिकारी, कर्मचारी या महिलाच असणार आहेत. महिला मतदान केंद्राची सुरक्षिततादेखील लक्षात घेतली जाणार आहे.**

**–राहुल मुंडके, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी, पनवेल**

## मोबाईल खेचून दोघे दुचाकीवरून पसार

**पनवेल :** पायी चालत असलेल्या १९ वर्षीय तरुणाच्या हातातून मोबाईल खेचून दोघांनी स्कूटीवरून पळ काढला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वंश खुटवड (सेक्टर



३५, खारघर) हा रात्री चालत येत असताना स्कूटीजवळ आली व पाठीमागे बसलेल्या एकाने त्याच्या उजव्या हातातील मोबाइल खेचून ते पळून गेले. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मतदारांना प्रचार पत्रकांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या विजयासाठीचा प्रचार भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी मतदारांना प्रचार पत्रकांचे वाटप करीत आहेत.

पनवेलमध्ये प्रचारावेळी भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, मुकीद काझी, विजय पाटील, रोहित म्हात्रे, रोहित आटवणे, नागेश म्हात्रे, सचिन गमरे, उज्वला पाटील, रूपेश आंबवणे, शिल्पा आरडे तर कळंबोलीमध्ये माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, प्रिया मुकादम, शिवसेनेचे रामदास शेवाळे, तुकाराम सरब, उत्तम पाटील, गणेश रणदिवे, मनिषा निकम, महादेव येरोळे तर पनवेल प्रभाग १८मध्ये सोशल मीडिया सेल संयोजक तथा ओबीसी जिल्हा मोर्चा सोशल मीडिया प्रभारी प्रसाद हनुमंते, माजी नगरसेविका नीता माळी, शिवसेना शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, यासोबतच खारघर प्रभाग क्र.०४ मध्ये महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी जोरदार प्रचार केला.





















**खारघर :** यश पवार यांनी बेलपाडा सेक्टर ३ येथे सुरू केलेल्या ‘मी सो हंग्री’ या रेस्ट्रॉरंटचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ब्रिजेश पटेल, किर्ती नवघरे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका अनिता पाटील, आरती नवघरे, महिला मोर्चा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, उत्तर भारतीय सेल अध्यक्ष सेल अध्यक्ष संतोष शर्मा, एनजीओ सेल संयोजक राजेंद्र मांजरेकर, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष रमेश खडकर, संजय घरत, विजय पाटील, चिटणीस शैलेंद्र त्रीपाठी, शहर सरचिटणीस निलम विसपुते, सोशल मिडीया संयोजक अजय माळी, युवामोर्चा शहर अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, आदित्य हातगे, महिला मोर्चा उपाध्यक्ष अश्विनी भुवड, अंकीता वारंग, चिटणीस अनीता जाधव, कोषाध्यक्ष निर्मला यादव, चिटणीस दुर्गा देवी, नुतन सिंग, दुर्गा बन्सल, जुमा चक्रवर्ती, नंदा पानसरे, प्रिया दळवी, रजनी मॅडम, प्रिया मॅडम, माया सिंग, स्नेहल बोधाई आदी उपस्थित होते.



**पनवेल : भगवान महावीर जयंतीनिमित्त आयोजित रॅलीमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी केदार भगत मित्र परिवारातर्फे ज्युस वाटप करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेविका नीता माळी, संजय जैन, पवन सोनी, केदार भगत, राजेश बांठिया आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उत्तम नियोजन व सहकार्याबद्दल वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ पनवेल अध्यक्ष राजेश बांठिया यांनी केदार भगत यांचे आभार मानले.**



**पनवेल : भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी उपस्थित उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, सचिन पाटील, भूषण जोशी, माधव गांगुर्डे यांनीही अनिल भगत यांचे वाढदिवस अभीष्टचिंतन केले.**

## संपादकीय

# वाढता उष्मा करतोय घात

देशभरात तापमानाचा पारा ३५ अंशांच्या वर सरकला आहे. पश्चिम बंगालमध्येही उष्णतेची लाट आली असून एक वृत्त निवेदिका बातमीपत्र वाचत असताना भोवळ येऊन पडल्याची घटना घडली. उन्हाचा तडाखा सर्वत्रच जाणवत आहेत. परिणामी उष्माघाताने लोक हैराण झाले आहेत.

**वातावरणातील बदलांमुळे यंदा उष्णतेच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. साधारणपणे मे हा महिना रखरखीत उन्हाचा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी मे महिन्यात उष्णतेचा पारा चढलेला असतो. यंदा मात्र एप्रिल महिन्यातच दाहकता जाणवत आहे. गेल्या काही दिवसांत पारा ४० अंश सेल्सिअसच्या पार गेल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत. दोन दिवस तर खूप त्रासाचे गेले. त्या तुलनेत आता थोडीशी घट आली असली तसेच अवकाळी पाऊस पडत असला तरी तो तात्पुरता दिलासा आहे. अगदी सूर्यदेव जणू आग ओकत असून सकाळी १० वाजल्यापासूनच उन्हाचे चटके बसायला सुरुवात होते. त्यामुळे असह्य होऊन जाते. दुपारी तर रस्त्यांवर शुकशुकाट पहायला मिळतो. अनेकांना उष्माघाताचा त्रास जाणवत आहे. काही दिवसांपूर्वी पालघरमध्ये एका तरुणीचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना समोर आली. ही तरुणी अकरावीत शिकत होती आणि पेपर देऊन घरी परतल्यानंतर घरी कोणी नसल्याने आई-वडिलांना शोधण्यासाठी नदीवर गेली होती. तिचा मृतदेह शेताजवळ आढळून आला. त्यानंतर आता पश्चिम बंगालमध्ये वृत्तनिवेदका बातम्या वाचत असताना बेशुद्ध झाली. विशेष म्हणजे उष्माघाताची बातमी वाचत असतानाच या महिलेला भोवळ आली. त्यांचा व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. प. बंगालमध्येही तापमान वाढले आहे. भारतीय हवामान विभागाने बंगालमध्ये पुढील दोन-तीन दिवसांमध्ये तापमान आणखी वाढण्याचा इशारा दिला होता. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचा धोका असतो. त्यामुळे सध्याच्या काळात नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्रखर उन्हात जास्त वेळ फिरल्याने उष्माघात होतो. याला इंग्रजीत सनस्ट्रोक असे म्हटले जाते. उन्हाळ्यात ४० अंश सेल्सिअसच्या वर तापमान गेले असताना सतत काम केल्यावर शरीर अस्वस्थ होते. थंड वातावरणातून किंवा अचानक एसी रूममधून कडक सूर्यप्रकाशात येणे, जास्त वेळ व्यायाम करणे, शरीरातील गरजेपेक्षा पाणी कमी होणे हीदेखील उष्माघाताची कारणे आहेत. उष्माघाताची बाधा झाल्यावर मळमळ, उलट्या, चक्कर, रक्तदाब कमी होणे अशी प्राथमिक लक्षणे दिसू लागतात. काही वेळा मानसिक स्थितीही बिघडते. उष्माघात झाल्यावर वेळीच उपचार मिळाले नाही तर संबंधित व्यक्तीचा मृत्यूदेखील होऊ शकतो. म्हणूनच उष्माघात टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. कडक सूर्यप्रकाशात बाहेर जाणे टाळावे. काही कारणास्तव घराबाहेर पडावे लागलेच तर द्रवपदार्थांचे भरपूर सेवन करून बाहेर जा. पाण्याची बाटली सोबत ठेवा. या दिवसांत सुती कपडे वापरा. उन्हाळ्यापासून संरक्षण करण्यासाठी छत्रीचा अथवा गॉगल, टोपी वापर करा. नारळ पाणी, लिंबूपाणी, थंड दूध इत्यादी द्रवपदार्थांचे सेवन सातत्याने करा. तहान लागलेली नसली तरीसुद्धा किमान जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे. उष्माघाताची लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.**

# ...तर मग विवाहासाठी मुहूर्त काढायचेच कशाला?





**खबरबात**
**विजय मांडे**

विवाह म्हणजे दोन जीवांचे आयुष्यभराचे मिलन. पूर्वी विवाह मुहूर्तावर लागायचे, परंतु हल्ली मुहूर्त फक्त कागदावरच म्हणजे लग्नपत्रिकेवरच असतो आणि लग्न मात्र सोयीनुसार होते. अगदी तीन-चार तास उशिरही होतो. मग वेळेवर उपस्थित असलेल्या वऱ्हाडाचाही विचार केला जात नाही. त्यामुळे विवाह मुहूर्त काढायचाच कशाला? असा विचार सहजच उपस्थितांमधून निघतो. एक मात्र खरे की कोरोना काळात जे विवाह झाले ते अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत लोकांच्या उपस्थितीत आणि अगदी मुहूर्तावर होत असत.

वैशाखात लग्न मुहूर्त खूप असतात. यंदा मेमध्ये मुहूर्त कमी आहेत. अगदी दोन-चारच आहेत. त्यामुळे एप्रिल महिन्यात विवाह उरकण्याची लगीनघाई करावी लागत आहे. या काळात कडक उन्हाळा असल्याने बहुतांश लग्न गोरज मुहूर्तावर काढले जातात, पण अगदी दोन-चार टक्के विवाहच अगदी मुहूर्तावर लागतात. कालच दोन भावांची लग्न झाली. एकाचे ६.५० व दुसऱ्याचे ७.१५ वाजता अगदी गोरज मुहूर्तावर होते, पण ही दोन्ही लग्न रात्री नऊ नंतर लागली. विशेष म्हणजे त्यांची वरात देवळात रात्री २ वाजता आली आणि तेथून केवळ तीनशे फुटावर घरी जाण्यासाठी या वरातीला तब्बल दीड तास लागला. साडेतीन वाजता नवरा-नवरीला घरात घेतले गेले.

डीजेचा कर्णकर्कश्य आवाज, फटक्यांची आतषबाजीला तर काही धरबंधच नाही. पोलीससुध्दा त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे साखरझोपेत असलेल्या नागरिकांच्या झोपेचे खोबरे होते, पण त्यांना त्याचे सोयरसुतक नव्हते. दुपारच्या मुहूर्ताचे तर विचारूच नका. ११.३०, १२ची लग्न ३ वाजता लागली आहेत. जे लोक वेळेवर आलेले असतात त्यांची हालत एकदम खराब होते. उन्हाळ्यात तर त्यांची पुरती वाट लागते. शिवाय अन्य ठिकाणी जायचे असते त्यांना तेथे जाता येत नाही. भटजींकडून काढलेल्या मुहूर्तावर लग्न लावल्यास ते लग्न यशस्वी होते असे पूर्वी म्हटले जायचे आणि असेसुद्धा म्हटले जायचे ज्यांच्या लग्नाचा मुहूर्त टळला त्यांचे वैवाहिक जीवन खडतर होते. असे अनुभवाचे बोल आहेत. काही मुहूर्त नववधूच्या मेकअपमुळे टाळतात, तर काही विवाह बँडवाले किंवा ढोल ताशेवाले उशिरा आले म्हणून उशिरा होतात. कोरोना काळात हेच विवाह केवळ ५ ते २० जणांच्या उपस्थितीत अगदी मुहूर्तावर पार पडले. अगदी सकाळी ७ वाजताचा मुहूर्तसुद्धा अगदी वेळेवर पाळला गेला. त्यांचे संसार आज दोन-तीन वर्षे झाली तरी सुरळीत आहेत.

पूर्वी घरातील मोठी माणसे मुलाला मुलगी बघायला जायचे आणि त्या असेल तशा मुलीशी निमूटपणे लग्न करण्यावाचून गत्यंतर नसे. मोठ्या माणसांपुढे बोलण्याची त्या वेळी हिंमत नव्हती, पण ते विवाह यशस्वी झालेले आहेत तसेच साखरपुड्याला पूर्वी नवरा मुलगा जात नसे. आता गेल्या २५-३० वर्षांपासून नवरा मुलगा साखरपुड्याला आवर्जून उपस्थित असतो. त्यामुळे त्याला पोशाख आणि एखादा अंगठी, ब्रेसलेट किंवा चैनसारखा सोन्याचा दागिना आणावा लागतो. त्याचा नाहक भुर्दंड मुलीच्या कुटुंबियांना पडतो. खरेतर विवाहाच्या अक्षदा अंगावर पडल्यानंतर मंगळसूत्र नववधूच्या गळ्यात बांधण्याची पद्धत आहे, पण आता काही समाजात साखरपुड्यालाच मंगळसूत्र बांधण्याची नवीन पद्धत सुरू झाली आहे. फोटोग्राफीचे विचारूच नका. लग्न जमल्यावर किंवा युवा-युवतीने जमवल्यावर शॉर्ट फिल्म काढण्याची नवीन पद्धत सुरू झाली आहे. अर्थात, बड्या लोकांची ही पद्धत आहे. त्याचे अनुकरण ऋण काढून सण करणारांनीसुद्धा अवलंबिली आहे.

हल्ली प्रेमविवाह करण्याकडे नव्वद टक्के युवक-युवतींचा कल आहे. त्याचे कारण प्रत्येकाला असलेली एक किंवा दोन अपत्ये. घरच्यांनी प्रेमविवाहाला परवानगी दिली नाही आणि 'एक दुजे के लिये' सारखे झाले तर काय करायचे? या भीतीने मनात नसले तरी घरचे लोक लगेच तयार होतात. हल्ली एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत चालली आहे. त्यामुळे नवरा-बायकोचा संसार आणि हम दो हमारे दो इथपर्यंत समीप होत असल्याने संस्कारालासुद्धा फाटा फुटत चालला आहे. पूर्वी विवाह झालेल्या नववधूचा डोक्यावरील पदर कितीही गडबड असली तरी खाली पडत नव्हता. हल्ली पदर सोडा ओढण्यासुद्धा गायब झाल्या आहेत. हा सारा गेल्या काही वर्षांपासून सुरू झालेल्या हिंदी व मराठी मालिकांचा परिणाम आहे असे वाटते.

अलिकडच्या काळात गरीब कुटुंबेसुद्धा कर्ज काढून आपल्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न करतो. 'एखाद्याने सरी घातली की दुसऱ्याने दोरी घालण्याचा' हा प्रकार आहे. हळदी समारंभ तर विचारू नका. काही महाभाग तर लग्न सोमवार, गुरुवार किंवा शनिवारी करतील, कारण हळदी समारंभाला वार खाण्याचा आला पाहिजे. हल्ली एखाद्याला लग्न किती तारखेला आहे? हे विचारल्यावर तो दोन तारखा सांगतो. उदा. लग्न २२ तारखेला असेल तर २१-२२ तारीख आहे असे सर्रासपणे सांगितले जाते. इतके हळदीला महत्त्व आहे. खरेतर हळदीला आलेली 'खास' मित्र मंडळी लग्नाला हजर नसतात. हळदीत मांसाहारीच करण्याकडे बहुतेकांचा कल आहे. त्या वेळी 'साग्रसंगीत' हळद साजरी केली जाते. या हळदी समारंभांमुळे युवकांना व्यसनाची सवय लागते. थम्सअपसारख्या पेयात मद्य टाकून मित्रांना फसवण्याचे प्रकार गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरू झाले आहेत. आपला मुलगा हळदीला गेला आहे. तो किती वाजता घरी येतो? कोणत्या परिस्थितीत येतो? याकडे दुर्लक्ष केले जाते आणि ती मुले व्यसनाधीन होतात. हे कटू सत्य आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सॲपच्या स्टेटसमध्ये येणार इन्स्टाग्राम फीचर

एखाद्या ठिकाणी फिरायला गेल्यावर आपण अनेक सोशल मीडिया ॲपवर फोटो, रील किंवा एखादी स्टोरी शेअर करतो. फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर ॲपवर तर आपल्या सगळ्यांना स्टोरी शेअर करता येते, पण व्हॉट्सॲपवर फोटो अपलोड करण्यासाठी 'स्टेटस अपडेट' हा पर्याय असतो, तसेच इन्स्टाग्राम ॲपवर एखादा ग्रुप फोटो अपलोड करताना ग्रुपमधील एखादी व्यक्ती फोटो किंवा व्हिडीओ स्टोरीवर अपलोड करते आणि मित्र-मैत्रिणींसह कुटुंबातील इतर सदस्यांनासुद्धा टॅग किंवा मेन्शन करते. तर असे केल्याने ती स्टोरी टॅग केलेल्या त्या प्रत्येक व्यक्तीला 'ड टू मेन्शन' करून स्वतःच्या स्टोरीवर अपलोड करता येते. तर आता असेच काहीस फीचर व्हॉट्सॲपमध्येसुद्धा युजर्सना दिले जाणार आहे.



व्हॉट्सॲपच्या या नवीन फीचरची चाचणी अद्याप सुरू आहे, जी युजर्सना त्यांचा स्टेटस अपलोड करताना अगदी इन्स्टाग्रामप्रमाणे खासगीरीत्या इतरांना मेन्शन करण्याची परवानगी देणार आहे. WABetaInfo च्या अहवालानुसार नवीन फीचर वापरकर्त्यांना स्टेटस अपडेटमध्ये निवडक संपर्कांना थेट टॅग करण्यास अनुमती देईल, असे केल्यास टॅग केलेल्या संपर्कांना नोटिफिकेशन जाईल. त्यामुळे एक गोष्ट नक्की होईल की, युजर्सना थेट अपडेट्स मिळत राहतील आणि त्यांच्यातील संवाद सुधारेल. त्यामुळे युजर्सचा एक्स्पीरियन्सदेखील अनेक पटींनी वाढेल.

हे फीचर तुम्ही मेन्शन केलेल्या युजरव्यतिरिक्त कोणालाही दिसणार नाही तसेच जर तुम्ही एखाद्या युजरने स्टेटस अपडेट म्युट केला असेल, तर त्या व्यक्तीला तुम्ही टॅग किंवा मेन्शन करू शकणार नाही आणि त्यांच्यापर्यंत नोटिफिकेशनसुद्धा पोहोचणार नाही. युजर्सना काही खासगी क्षण निवडक लोकांबरोबर शेअर करायचे असल्यास हे फीचर त्यांना खरेच उपयोगी पडेल. संपर्काचा खासगीरीत्या स्टेटस अपडेट्समध्ये मेन्शन करण्याच्या या खास फीचरमुळे वापरकर्त्यांमध्ये लक्षणीय वाढ होण्याची कंपनीची अपेक्षा आहे. तर आता लवकरच युजर्स आपल्या आवडीच्या कॉन्टॅक्टला आपले स्टेटस दाखवण्यासाठी त्यांना मेन्शन करू शकतील. त्यामुळे कॉन्टॅक्टला स्टेटस अपलोड झाल्यानंतर लगेच नोटिफिकेशन मिळेल.

# जागतिक वसुंधरा दिन

पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृती करण्यासाठी हा दिवस जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूंपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी, संपातबिंदू पथ्वी दिन पाळतात.

पर्यावरणरक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल, इ.स. १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला, तरीही त्या कार्यक्रमाचा राष्ट्रीय समन्वयक असलेला डेनिस हेस याने स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन करून पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सध्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली.



**निमित्त**

पर्यावरणाच्या सतत ढासळणाऱ्या निसर्गाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि टिकाऊपणाला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन साजरा केला जातो. हा दिवस आपल्याला आपली पृथ्वी आणि तिची परिसंस्थेच्या संरक्षणाच्या महत्त्वाची आठवण करून देतो.

पहिला वसुंधरा दिवस २२ एप्रिल १९७० रोजी साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा पृथ्वीवरील प्रत्येक मानवासाठी एक जागतिक कार्यक्रम बनला आहे, लाखो लोकांनी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, शैक्षणिक उपक्रम आणि इतरांना प्रेरणा देणे यासारख्या उपक्रमांमध्ये भाग घेतला. तसे करणे, आणि पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

जगातील इतर देशांप्रमाणे भारतातही पर्यावरणाची स्थिती चांगली नाही, ज्याचा परिणाम भारताच्या हवामानावर होत आहे. भारतातील जागतिक वसुंधरा दिनाचे संवर्धन आणि पर्यावरणाचे महत्त्व समजून घेण्यासाठी येथे काही महत्त्वाच्या टिप्स आहेत. याची अंमलबजावणी करून आपण पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी हातभार लावू शकतो.

वृक्षारोपण मोहीम : जागतिक वसुंधरा दिनानिमित्त आपण वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला पाहिजे. शाळा, महाविद्यालय, कार्यालयात किंवा समाजातील सदस्यांसह रोपटे लावा.

संस्थेचा कार्यक्रम : एक संघटनात्मक कार्यक्रम आयोजित करा ज्यामध्ये प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरण रक्षण यावर खुली चर्चा होईल.

सामुदायिक स्वच्छता मोहीम : परिसरातील काही मित्रांसोबत स्वच्छता मोहीम आयोजित करा, ज्यामध्ये स्थानिक ठिकाणे स्वच्छ करून पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी जनजागृती केली जाऊ शकते. पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कार्यशाळा: पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कार्यशाळा आयोजित करा, ज्यामध्ये लोकांना अधिक माहिती आणि नवीन कल्पना सामायिक करण्याची संधी मिळेल.

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : तन्वी पवार)




**पनवेल : यंदाचा उन्हाळा तीव्र आहे. त्यामुळे दिवसा असह्य होऊन जाते. सारखी तहान लागते आणि थंड पाणी प्यावेसे वाटते, पण काही जणांना फ्रिजमधील पाण्याचा त्रास होतो. अशा वेळी माठातील पाणी उपयुक्त ठरते. सध्या या माठांना वाढती मागणी आहे.**

## आरोग्य प्रहर

### डायबिटीक रुग्णांनी आंबा खाल्ल्याने काय होईल?

मधुमेहाचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी नक्की काय खावे याबाबत अनेकदा वाद होतात. आज आपण खरोखरच मधुमेह असलेल्यांसाठी आंबा हे सुरक्षित फळ आहे का? याविषयी तज्ज्ञांकडून माहिती घेणार आहोत.



आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स ५० ते ५५पर्यंत मध्यम असतो. (एखाद्या पदार्थाची रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढवण्याची क्षमता मोजणारे हे एक मूल्य आहे. ग्लायसेमिक इंडेक्स जितका जास्त असेल तितका ग्लुकोज वेगाने शोषला जातो आणि रक्तातील साखरेची तीव्र वाढ होते). नियंत्रित मधुमेह असलेल्यांना कमी प्रमाणात आंब्याचे सेवन करण्यास हरकत नाही.

डॉ. मोहन डायबिटीज स्पेशॅलिटी सेंटर, चेन्नईचे अध्यक्ष डॉ व्ही मोहन यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, आंब्यामुळे रक्तातील साखरेची वाढ होते पण ही नैसर्गिक साखर असते. रिफाइंड पीठ किंवा तांदूळ खाल्ल्याने अचानक जशी रक्तातील साखर वाढते तसा त्रास होत नाही. आंब्यामध्ये भरपूर फायबर असते, ज्यामुळे साखरेचे शोषण आणि अँटी-ऑक्सिडंट्स कमी होतात. आंब्याला फळ म्हणून नव्हे तर कार्बोहायड्रेटचा स्रोत म्हणून पाहायला हवे. मधुमेह असल्यास कार्ब्स व कॅलरीजचे सेवन प्रमाणात असणे गरजेचे असते. त्यामुळेच अर्धा किंवा पूर्ण आंबा खाणार असाल तर त्यादिवशी अन्य माध्यमातून (जसे की, भात, पोळी, अन्य फळे) कॅलरीचे सेवन टाळा. तसेच आंब्याचे सेवन सुद्धा अर्ध्या किंवा जास्तीत जास्त एका आंब्याहून अधिक नसावे. आंबा हा मुख्य जेवणासह गोडाचा पदार्थ म्हणून खाऊ नये कारण यामुळे कॅलरीजचा भार वाढू शकतो. दिवसभरात रक्तातील साखरेचे प्रमाण स्थिर ठेवण्यासाठी स्नॅक्स म्हणून सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळी आंबा खाऊ शकता.

मॅक्स हेल्थकेअरच्या एंडोक्राइनोलॉजी आणि मधुमेह विभागाचे अध्यक्ष डॉ. अंबरिश मिथल यांनी पुढे अधोरेखित केले की, जर तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण अनियमित असेल आणि Hb-१c (तीन महिन्यांतील सरासरी रक्तातील साखर) जास्त असेल, तर आंब्यासह अन्य कार्बोहायड्रेट-समृद्ध पदार्थ व फळंसुद्धा टाळायलाच हवीत.

# लहान मुलांमध्ये उष्माघाताचा धोका

## प्रशासनाकडून उष्णतेच्या लाटेबाबत अलर्ट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

देशात उष्णतेची लाट पसरली असून जिल्ह्याचा पारादेखील ४० अंशावर पोहचला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून उष्णतेच्या लाटेबाबत अलर्ट जारी करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत ३ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये उष्माघाताचे प्रकार वाढण्याची शक्यता असल्याने अत्यंत सावध राहण्याची गरज आहे. त्यामुळे आपली मुले दररोज किमान १० ग्लास पाणी पित असल्याची खात्री पालकांनी करणे गरजेचे आहे. तसेच पाण्याबरोबरच आहारात द्रव पदार्थांचे सेवन, ओरल रिहायड्रेटिंग तसेच दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे, अशा सूचना डॉक्टरांकडून करण्यात आल्या आहेत.



उष्णतेची लाट ही सर्वच वयोगटातील व्यक्तीवर परिणाम करत असून प्रौढांमध्ये तसेच लहान मुलांमध्ये मूर्च्छा येणे, चक्कर येणे, डोकेदुखी आणि बेशुद्ध पडणे असे प्रकार होत असल्याचे आढळून येत आहेत. घराबाहेर खेळणे आणि व्यायाम केल्याने मुलांच्या शारीरिक विकासात मदत होत असली तरी, अतिउष्णतेमध्ये ही क्रिया करणे मुलांसाठी योग्य नाही. उच्च तापमान आणि अतिउष्णतेमुळे मुले आजारी पडतात, कारण त्यांचे निर्जलीकरण होते (अत्याधिक घाम येणे), उष्णतेमुळे थकवा येतो आणि उष्माघातासारखी समस्या उद्भवू शकते. निर्जलीकरणामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होते. त्यामुळे मुलांमध्ये मळमळ आणि उलटी, थकवा, डोकेदुखी, तोंड कोरडे पडणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे यांसारखी लक्षणे दिसून येतात. तीव्र उष्णतेमुळे चिडचिड होऊन श्वास घेण्यास त्रास होतो आणि एखाद्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची वेळ येऊ शकते.

### द्रव पदार्थांचे सेवन जास्त करावे

*मुलांना ठराविक अंतराने द्रव पदार्थांचे सेवन करण्यास देणे, खेळताना ठराविक अंतराने विश्रांती घेण्यास सांगणे, दिवसातून किमान १० ते १३ ग्लास पाणी पिण्यास देणे, मुलांना थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवणे, होममेड ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन बनवून ते मुलाला वेळोवेळी पाजणे आवश्यक आहे, असा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात आला आहे.*

**गत महिन्यापासून उष्माघाताच्या समस्येने पिडीत बालरुग्णांची संख्या वाढली आहे. खेळण्याच्या नादात मुले अनेकदा पाणी पिण्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भरपूर पाणी पिणे आणि कार्बोनेटेड पेय किंवा शर्करायुक्त पेयांचे सेवन करणे गरजेचे आहे.**

**–डॉ. संजू सिदाराद्दी,** बालरोगतज्ज्ञ आणि नवजात रोगतज्ज्ञ

**शरीरातील पाण्याचे प्रमाण वाढवणे हाच उष्माघातापासून दूर करण्याचा सर्वांत सोपा उपाय आहे. उष्माघातावर घरच्या घरी नियंत्रण ठेवले जाऊ शकते. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास बाळाला ओरल रिहाइड्रेशन सोल्युशन अर्थात ओआरएस द्यावे. कधी कधी साधे पाणी पुरेसे नसते. अशावेळी साखर, मीठ आणि पाण्याचे मिश्रण असलेले पाणी फायद्याचे ठरते.**

**–डॉ. वृक्षल शामकुवर,**
पीआयसीयू प्रमुख आणि बालरोगतज्ज्ञ

# पाणी नियोजनामध्ये माणगाव अग्रेसर

**२०२५पर्यंत मिळणार सर्वांना जल**


**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत तालुक्यात अनेक गावांना पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या आहेत, मात्र या योजनेतील काही कामे अद्याप बाकी आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाचे वर्षीही मार्च महिन्यापासून माणगाव तालुक्यातील काही गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. शासनाच्या पाणी टंचाई आराखड्यातून ही गावे वर्षानुवर्ष समाविष्ट केलेली आहे.

माणगाव तालुक्यातील यंदाच्या वर्षी २४ गावे व ३२ वाड्यातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. शासनांनी माणगाव तालुक्यात १५३ जलजीवन मिशन योजनेची कामे हाती घेतली आहेत. त्यापैकी ७७ कामे पूर्ण झाली आहेत, तर ७६ कामे प्रगतिपथावर असून ती २०२५पर्यंत पूर्ण होतील अशी आशा नागरिकांना वाटत आहे. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलजीवन मिशन योजना राबविली जात असली तरी माणगाव तालुका हा जलजीवन योजनेच्या कामात जिल्ह्यात अग्रेसर राहिला आहे.

यंदा मार्च महिन्यापासूनच कांही गावातील नागरिकांची पाण्यासाठी पायपीट सुरू झाली आहे. दिवसेंदिवस उष्णता वाढू लागल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खालावू लागल्याने माणगाव तालुक्यातील काही गावातील पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे. मार्च महिन्यापासून माणगाव तालुक्यातील २४ गावे व ३२ वाड्यातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असले तरी तालुक्यातील अनेक गावांना पाणी टंचाईशी सामना यापुढील काळात करावा लागणार आहे. ही गावे पाणीटंचाई मुक्त करण्यासाठी शासनाने जलजीवन मिशन योजनेतून सर्वांना पाणी देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. १५३ जलजीवन मिशन योजनेच्या कामापैकी २८ कामे भौतिकदृष्ट्या तर ४९ कामे आर्थिकदृष्ट्या असे एकूण ७७ पाणी योजना पूर्ण केल्या असून या गावांना पाणीपुरवठा सुरू आहे. उर्वरित ७६ पाणी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

जलजीवन मिशन योजनेंतर्गत माणगाव तालुक्यातील गाव, वाडी या योजनेपासून वंचित राहणार नाही. यासाठी शासनाने महत्वपूर्ण पाऊल टाकले आहे. जिथे पाण्याचे स्तोत्र नाही. तिथेही जलजीवन योजना राबविण्यात आले आहे. प्रगतीपथावर असणारी ७६ कामे ही शासनाने ठरवून दिलेल्या २०२४–२५ या कालावधी पूर्वीच पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यानंतर सर्वांना पाणी मिळणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा, माणगाव



सहा शाखा अभियंता पदे मंजूर आहेत. पैकी सर्व पडे रिक्त आहेत. तरीही माणगाव उपविभागीय उपअभियंता प्रशांत म्हात्रे यांनी ही कामे पूर्ण करण्यासाठी उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे रायगड जिल्ह्यात माणगाव तालुका हा पाणी पुरवठा जलजीवन मिशन कामे पूर्ण करण्यात पहिल्या क्रमांकावर आला आहे.

### या गावांची कामे पूर्ण

**आमडोशी, बामणोली, भाले, भांडीवली, बोंडशेत, बोरवली बोरमाच, बोरघर, चेरवली, दाखणे खर्डी, ढाकशेळी, धामणी, डोंगरोली, गोवेलेकोंड, हरकोल, हरकोल कोंड, हातकेळी, जावळी, जावठे, जिते, कडापे, कालवण, कांदळगाव खुर्द, कोस्ते बुद्रुक, कुरवडे, मढेगाव, मांगरुळ, मांजूर्णे, मुगवली, नवशी, पाचोळे, पन्हळघर बुद्रुक, पाणोसे, पेण तर्फे तळे, रानवडे कोंड, रातवड, रिळे, रुद्रवली, सांगी, शिलिम, शिरवली तर्फे गोवेले, शिरसाड, सुरव तर्फे तळे, ताम्हाणे तर्फे गोरेगाव, तारणे तर्फे गोवेले, टेमपाले, उमरोली खरवली, उंबर्डी, वाढवण, वाकी तर्फे निजामपुर. जलजीवनची आर्थिकदृष्टया या गावांची कामे पूर्ण झाली. गोवेले, जोर, काकल, कळमजे, कशेणे, कोल्हाण, कुंभे, कुमशेत, मशिदवाडी, मुठवली तर्फे निजामपुर, मुठवली तर्फे तळे, निवी, पहेल, फलाणी, रेपोली, शिरवली तर्फे निजामपुर, उमरोली दिवाळी, उसरघर, विळे, वडवली, वडवली कोंड, खडकमाळ आदिवासीवाडीत 'जल जीवन'ची भौतिकदृष्ट्या कामे पूर्ण झाली आहेत.**

# मोटरसायकल चोरणाऱ्यांना अटक

## माहिती देणाऱ्याचा पोलिसांकडून सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील दत्तवाडी परिसरात राहणारे देवेंद्र दत्तात्रेय गुरव यांची मोटारसायकल हिरो कंपनीची पॅशन गाडी (एमएच ०६ बीटी २८३६) चोरीस गेली होती. माजी नगरसेवक बाळकृष्ण गोंजी यांच्या माहितीमुळे मूळ गुन्हेगार पकडण्यात महत्वाची मदत झाली म्हणून पोलीस निरीक्षक निशा जाधव व पोलीस उपनिरीक्षक राठोड यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

मध्यरात्रीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांची मोटर सायकल चोरून नेली होती. ही मोटरसायकल अंगणात असतानासुद्धा ती चोरून नेण्यात आली होती. याबाबतची रीतसर तक्रार गुरव यांनी मुरूड पोलीस ठाणे येथे नोंदवली होती.त्याप्रमाणे गुन्ह्याचा तपास जलद गतीने होण्यासाठी पोलिसांनी त्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज शोधण्यास सुरुवात केली. या वेळी त्यांना मोटरसायकल चोरून नेताना त्या मोटरसायकलवर दोन मुले व एक महिला घेऊन जात असताना दिसून आली.

फुटेजमधील व्यक्ती शोधून काढण्यासाठी पोलिसांनी चौकशी सुरू केली. मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांसाठी चेंजिंग रूम व प्रसाधान गृह आहे. ही देखभाल माजी नगरसेवक बाळकृष्ण गोंजी करीत असतात. आरोपींचे फुटेज प्राप्त करून मुरुड येथील माजी नगरसेवक बाळकृष्ण गोंजी



यांना फुटेज दाखविले असता त्यांनी हे आरोपी यांना ओळखून ते त्यांचेकडे तीन दिवस आंघोळी करीता येत असल्याचे सांगून आरोपींचे मोबाईल नंबरसुद्धा पोलिसांना तपासासाठी मोठे सहकार्य केले. पोलिसांनी प्राप्त माहितीवरून वरून सीडीआर व एसडीआरवरून आरोपी हे पुणे येथील असल्याचे निष्पन्न केले.

आरोपींना पकडून आणण्यासाठी पोलीस पथकाने पुणे येथे जाऊन आदित्य विश्वनाथ पवार, अभिषेक अविनाश बनसोडे, किर्तिका विजय लोंढे हे (सर्व राहणार बिबवेवाडी पुणे) यांना अटक करण्यात आली.

# कोर्लई येथे उधारीवरून दुकानदाराला मारहाण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोर्लई येथे रात्रीचे सुमारास उधारीने सामानाची मागणी केली असता, सामान देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून चौघानी दुकानात शिरून दुकानदारास मारहाण केली व त्याच्या पत्नीस शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे.

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे १५ एप्रिल रोजी रात्री साडेअकराचे सुमारास दुकानदार लियाकत फिरफीरे (वय ४०) वर्षे यांचेकडे कोर्लई गावातील फारुख बेबल (वय २०), विजेंद्र चोरडेकर (वय २४), आर्यन कोटकर वय २२ वर्षे व आक्षी साखर येथील यश घाडगे (वय २४) यांनी उधारीने सामानाची मागणी केली, दुकानदार लियाकर फिरफिरे यांनी त्यांना उधारी देण्यास नकार दिला.

याबाबीचा राग मनात धरून दुकानात शिरून लियाकत फिरफिरे यांना चौघांनी लाथाबुक्काने मारहाण केली व त्याचे पत्नीस शिवीगाळ केली. या मारहाणीत दुकानाचे काचेकर दगड फेकून दुकानाची काच फोडली तसेच या वेळी तेथे असलेले सलिम सुदेकर यांनादेखील मारहाण केली. या वेळी फारूख बेबल यांनी सलिम कुदेकर यांचे हाताचे बोटाला चावा घेत दुखापत केली.

याबाबत दुकानदार लियाकर फिरफिरे यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीनुसार भादविकलम ४५२,३२५,३२३,३३६,४२७,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामधील १९ एप्रिल रोजी फारूख बेबल, विजेंद्र चोरडेकर व आर्यन कोटकर यांना अटक करण्यात आली असून अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक शिवकुमार नंदगावे हे करीत आहेत.

# रसायनीत दुर्गामाता वर्धापन दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथे दुर्गा माता मंदिराचे २४ वा दुर्गामाता वर्धापन दिन सोहळा सालाबादप्रमाणे दुधे परिवाराकडून साजरा केला जातो. स्वर्गीय बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या दुर्गादेवी मंदिरात सालाबादप्रमाणे वर्धापन दिनानिमित्त होमहवन अभिषेक, प्रासादिक भजन, माता की चौकी, आरती, स्वर संगीत भजन व सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.

स्नेह कुंज आधारगृह नेरे साई आश्रय वृद्धाश्रम पनवेल येथे दुधे परिवाराच्या वतीने अन्नधान्य वाटप कार्यक्रम करून प्रसिद्ध उद्योजक तुकाराम दुधे यांनी नवसाला पावणारी दुर्गादेवीच्या दर्शनाची व महाप्रसादाची परंपरा अध्यात्मिक संस्कृती असल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना माहिती दिली. या वेळी संपूर्ण दुधे मित्र परिवार व शेकडो भाविकांची मोठी गर्दी पहायला मिळाली.



# मुरूडमध्ये कोटेश्वरी माता पालखी

## शेकडो भाविक सहभागी

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्री ग्रामदैवत कोटेश्वरी मातेची पालखीची मिरवणूक मोठ्या ढोल ताशा जल्लोषात कोटेश्वरी मंदिरापासून ते कुंभार वाडा, दत्तवाडी, जुनी पेठ, लक्ष्मीखार आदिंसह शहरातुन भव्य मिरवणूक काढण्यात आली. या पालखी निमित्त शेकडो भक्त सहभागी झाले होते. देवीच्या दर्शन व ओटी भरण्यासाठी सुवासिनी गर्दी केली होती.

या पालखीचा मान कुंभारवाडा, साळीवाडा, संत रोहिदास नगर यांना मिळाला. या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष – नयन कर्णिक, पालखी अध्यक्ष – सुधाकर दांडेकर व विश्वस्त पालखीत सहभागी होते. सकाळी कोटेश्वरी माते पुजन दुधाचा अभिषेक करण्यात आले या पुजेचे मानकरी– प्रकाश चव्हाण व त्यांच्या पत्नी प्राजक्ता चव्हाण व विलास मुरुडकर व त्यांच्या पत्नी सौ मुरुडकर यांना मिळाला.

मुरुड शहराचया प्रवेशद्वाराजवळ श्री ग्रामदैवत श्री कोटेश्वरी मंदिराची१९७० साली जीर्णोध्दार झाला. दरवर्षी चैत्र शुद्ध चतुर्दशीला मोठी यात्रा भरते. यात्रेच्या आदल्यादिवशी ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ल्यात श्री कोटेश्वरी देवीचे पूजन केले जाते. सायंकाळी कोटेश्वरी मंदिरातून देवीचा चांदीचा मुखवटा पालखीत ठेवून फटाक्यांची आतषबाजी केली जाते. जागोजागी देवीची खणा–नारळानी ओटी भरून तिचे स्वागत केले जाते. पुन्हा पालखी मंदिरात आणून देवीची आरती केली जाते.

दुसऱ्यादिवशी सकाळपासून यात्रेला सुरुवात होते. या यात्रेतून स्थानिक नागरिकांना रोजगार मिळतो. यात हजारो रुपयांची उलाढाल होते.




# मृगगडावर बसविले सुरक्षा रोप

## दुर्गप्रेमी, ट्रेकर, ग्रामस्थ सुखावले

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील भेलिव येथील मृगगड हा किल्ला ऐतिहासिक महत्त्वपूर्ण किल्ला आहे. मृगगड किल्ल्यावर ट्रेकर आणि पर्यटकांचा येण्याच्या ओघ वाढला आहे, मात्र मागील काही वर्षांत पावसाळ्यात केल्या जाणाऱ्या ट्रेकिंगमुळे आणि निष्काळजीपणामूळे काही अपघात झाले आहेत. तसेच किल्ल्यावरून पडूनही काही लोकांचे अपघात होऊन त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता दुर्गवीर प्रतिष्ठान तर्फे नुकतेच मृगगडावर धातूचे सुरक्षा रोप लावून किल्ला सुरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे दुर्गप्रेमी, ट्रेकर व ग्रामस्थ सुखावले आहेत.

दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून गेली १३ वर्षे किल्ल्यावर संवर्धनाचे काम सुरू आहे. किल्ल्यावरील पाण्याचे टाके, वास्तू आणि माहिती फलक अशी अनेक कामे केली गेली त्यामुळे किल्ला आज सुस्थितीत बघायला मिळत आहे. किल्ल्यावरील कातळ कोरीव पायऱ्या पावसाळ्यात शेवाळामुळे निसरड्या होतात. गवत वाढल्यामुळे आणि वरून माती वाहून आल्यामुळे त्यावर पाय नीट ठेवता येत नाही आणि खोबण्या मातीने भरून जातात आणि चढाई – उतराई करताना खूप सावधपणे वावर करायला लागतो नाहीतर अपघात होतात. ही गंभीर समस्या लक्षात आल्यावर आणि भविष्यात किल्ल्यावर येणाऱ्या लोकांचा ओघ बघता येथील



मार्ग सुरक्षित करणे गरजेचे होते. कारण कोणताही अपघात झाल्यावर लोकं किल्ल्याला नावं ठेवतात येणाऱ्या पर्यटकांची काही चूक आहे का ते बघितले नाही जात त्यामुळे हा मार्ग सुरक्षित करणे गरजेचे आहे, हे ओळखून दुर्गवीर प्रतिष्ठान तर्फे रेकी केली आणि मार्ग सुरक्षित करण्याचे नियोजन झाले. मग सगळी टीम कामाला लागली.

या मोहिमेत दुर्गवीर प्रतिष्ठानचे अर्जुन दळवी, प्रशांत डिंगणकर, विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, कृपेश बेलकर, रुपेश लाखाडे, अजय शिंदे, अमोल सुर्वे, प्रतीक सुर्वे, सिद्धांत शिंदे, राज मेस्त्री, महेश सावंत, प्रतीक पाटेकर, प्रतीक इंदुलकर, प्रतीक भोंनकर, स्वप्नील भगत आणि ऋषिकेश मसने हे दुर्गवीर सहभागी झाले होते.

**खूप समाधान वाटले एक मोठी मोहीम सुरक्षितरित्या पूर्ण झाल्याची आणि किल्ला आता खऱ्या अर्थाने येणाऱ्या गिर्यारोहक आणि पर्यटकांसाठी सुरक्षित झाला. पूर्ण टीम चे अभिनंदन व धन्यवाद.**

**–संतोष हसुरकर,** अध्यक्ष दुर्गवीर प्रतिष्ठान

### मृगगड झाला सुरक्षित

*कामासाठी लागणारे सगळे सामान वायर रोप, बोल्ट, फिशर प्लेट (क्रपसशी), यु क्लॅम्प आदी सर्व साहित्य खरेदी केले. ठरल्याप्रमाणे सगळ्या टीम मुंबईतून किल्ल्याच्या पायथ्याच्या भेलिव गावासाठी रवाना झाल्या. उन्हाळा असल्यामुळे खूप पाण्याचा साठा घेण्यात आला. त्यांनतर टीम किल्ल्यावर पोहचली आणि लगेच कामाला सुरुवात झाली. कुठे बोल्टिंग करायची आहे याची मार्किंग करण्यात आली आणि ड्रिल मशीनने बोल्टिंगला सुरुवात झाली. खिंडीमध्ये आणि पायरी मार्गावर एकूण १८ बोल्ट मारण्यात आले. आणि फिशर प्लेट (क्रपसशी) लावण्यात आली. दोन बोल्ट मधील मार्किंग केल्याप्रमाणे वायर रोप कापण्यात आला आणि माप घेतल्याप्रमाने रोप लावण्यास सुरुवात झाली. यु क्लॅम्प लावून सगळे रोप लावण्यात आले. आणि मृगगड सुरक्षित झाला.*

### मोहिमेत अनेकांची मदत

*सर्व मोहिमेत दुर्गवीरांसोबत खरी मदत झाली ते म्हणजे टेक्निकल टीम म्हणून अडव्हेंचर इंडीया टीम मधून प्रशांत खैरनार, अमित खरात, मनोज भालेघरे आणि मंगेश बाळू कोयंडे यांची. तसेच लोणावळ्यातील शिवदुर्ग संस्थेने बॅटरीवर चालणारी ड्रिल मशीन दिली त्यामुळे बोल्टटिंग कमी श्रम व वेळेत पूर्ण झाली.*

### गडावर आजवर झालेली कामे

*१.गडावरील महत्त्वाची पाण्याची टाके स्वच्छता मोहिमा.*
*२.गडावर इतिहास माहिती फलक लावले*
*३.गडपायथा ते गडापर्यंत दिशादर्शक फलक लावले*
*४.गड पायथ्याशी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेचा एक वर्ग पुनः बांधणी करण्यात आला.*

# खासदार श्रीरंग बारणेंच्या विजयाचा निर्धार

## महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून जोरदार प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी उत्साहात प्रचार करीत आहेत.

विहीघर, खारघर, नावडे, कानपोली आणि हेदूटने, कळंबोलीमध्ये श्रीरंग बारणे यांचा जोरदार प्रचार करण्यात आला. या वेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचार पत्रकांचे वाटप मतदारांना करत श्रीरंग बारणे यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत.

आदई पंचायत समिती अंतर्गत विहीघर गावात प्रचारावेळी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, सुनील पाटील, विश्वजीत पाटील, सागर पाटील, संदेश फडके, अक्षय पाटील, नितीन पाटील, राकेश फडके, स्वप्नील फडके, खारघर येथे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, साधना पवार, चंचला वनकर, रीना पाटील, अंकिता वारंग, शहर अध्यक्ष शिवसेना प्रसाद परब, वासुदेव पाटील, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, किरण पाटील, नरेश तोडकर, दत्ता तांबोली, अनिल खोपडे, फुलाजी ठाकूर, गुरू ठाकूर तसेच प्रभाकर घरत, विजय पाटील, नावडे येथे ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक साळुंखे, वॉर्ड क्रमांक २ अध्यक्ष व पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, दिनेश खानावकर, महेश पाटील, राम पाटील, कानपोली आणि हेदूटने, कळंबोली येथे माजी नगरसेवक बबन मुकादम, झोयेब पटेल आदी महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.























## निवडक

### पेण तर्फे तळे येथे पालखी सोहळा



**माणगाव** : ओम आदिनाथ मंडळातर्फे प्रतिवर्षीप्रमाणे सिद्धांत समर्थ सद्गुरू दगडूनाथ स्वामी महाराज यांचे मुख्य शिष्य वै. श्री समर्थ सद्गुरू नथुराम महाराजांची ५१वी पुण्यतिथी व श्री सत्यनारायण देवाचा महोत्सव वै. तुकाराममहाराज पतारे यांच्या कृपाशीर्वादाने, पार्वतीबाई तुकाराम पतारे, विठोबामहाराज मांडळुस्कर यांच्या मार्गदर्शनाने नुकताच पेण तर्फे तळे येथे उत्साहात झाला. यातील पारायणाचे नेतृत्व विठोबामहाराज मांडलूस्कर, शिवाजीमहाराज जाधव व ह.भ.प.नारायण महाराज पतारे यांनी केले. यानिमित्ताने राम जन्मोत्सव सोहळा, ज्ञानेश्वरीतील नवव्या व बाराव्या अध्यायाचे वाचन, पुष्पवृष्टी व दिंडी सोहळा झाला तसेच चक्री प्रवचन, समुदायिक भजन, कीर्तन, हरिपाठ झाला.

### सामाजिक संस्थेची स्थापना

**खालापूर** : सामाजिक कार्यकर्त्या वर्षा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या नागरी सामाजिक विकास संस्थेचे उद्घाटन खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या हस्ते झाले. खालापूर तालुक्यातील श्री क्षेत्र धाकटी पंढरी येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात संस्थेचा उद्घाटन समारंभ तसेच मंदिर प्रशासनासाठी आवश्यक साहित्य आणि वस्तूंचे या वेळी लोकार्पण करण्यात आले. खोपोली नगरपालिका शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी जयश्री धायगुडे, धाकटी पंढरी देवस्थान समितीचे अध्यक्ष अनंता पाटील, उपाध्यक्ष जयवंत पाटील यांनी संस्थेस शुभेच्छा दिल्या. ताराराणी ब्रिगेडच्या अध्यक्ष वंदना मोरे, उपाध्यक्ष कविता खोपकर, मेघा मोरे, किशोरी चेऊलकर, रिद्धी केणी यांनीही कौतुक केले.



# खासदार सुनील तटकरे यांना नागोठणे विभागात जोरदार पाठिंबा

## वरवठणेतून जास्तीत जास्त मताधिक्य देण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

**नागोठणे : बातमीदार**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एनडीए आघाडीचे रायगड लोकसभा मतदारसंघांचे उमेदवार खासदार सुनील तटकरे सुतारवाडी येथून रेवदंडा अलिबाग येथे जात असताना त्यांनी नागोठणे विभागातील वरवठणे येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते व आमदार रविशेठ पाटील यांचे खंदे समर्थक सुभाष पाटील यांच्या निवासस्थानी ग्रामस्थांची भेट घेतली. त्या वेळी उपस्थित विविध पक्षातील ग्रामस्थांनी खासदार तटकरे यांना पाठिंबा दर्शविला.



खासदार सुनील तटकरे यांना पुन्हा निवडून आणण्यासाठी नागोठणे विभागातील महायुतीचे कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत असून खासदार तटकरे यांना नागोठणे विभागात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. वरवठणे येथील भेटीवेळी तेथील ग्रामस्थांनी आम्ही विरोधी पक्षात असूनदेखील आमची वैयक्तिक कामे व गावाचा विकास तुम्ही केला. त्यामुळे आम्ही कुठल्याही पक्षाचा विचार न करता फक्त साहेब हेच आमचा पक्ष असून वरवठणे गावातून जास्तीत जास्त मताधिक्य देणार, अशी ग्वाही खासदार सुनील तटकरे यांना दिली.

या वेळी राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, हरीश काळे, रोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गणपत म्हात्रे, राष्ट्रवादी विभाग अध्यक्ष संतोष कोळी, नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, सुभाष पाटील, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराज पानसरे, संतोष लाड, यशवंत करजेकर, पांडुरंग म्हात्रे, अशोक म्हात्रे, प्रकाश पाटील, दत्ताराम करजेकर, परशुराम बैकर, नथुराम दांडेकर, काशिनाथ दाभाडे, रामचंद्र पाटील, नरेंद्र पाटील, संदीप दाभाडे, हरिश्चंद्र ढमाल, विलास भोय, राकेश म्हात्रे, ऋषिकेश पाटील, सुमित पाटील, नामदेव मढवी, अजय साळुंखे, बिपीन सोष्टे, ॲड. गणेश जाधव, प्रवीण बडे, निवृत्ती जंगले, सौरभ गोळे, वसिम बोडेरे, रयान पानसरे आदींसह विविध पक्षांतील कार्यकर्ते व वरवठणे ग्रामस्थ उपस्थित होते.

## मुरूड येथे महावीर जयंती उत्साहात साजरी

**मुरूड : प्रतिनिधी**

जैन धर्मियांचे २४वे तिर्थकर भगवान महावीर यांची जयंती मुरुडमध्ये प्रतिमा पालखी व भव्य रथ मिरवणूक काढून साजरी करण्यात आली. या वेळी धर्मगुरू, जैन बंधू-भगिनी यांची उपस्थिती होती.

महावीर जयंतीमुळे मुरुड शहरातील सर्व दुकाने काही काळासाठी बंद ठेवण्यात आली होती. मिरवणूक शहरातील विविध भागात फिरवण्यात आली. या मिरवणुकीत जैन धर्मगुरूसुद्धा उपस्थित होते. या वेळी त्यांनी सांगितले की, भगवान महावीर यांनी नेहमीच विश्वशांतीचा संदेश दिला आहे. भारतात लवकरच जुन्या संस्कृतीचा अमल लोक करतील, कारण जे पाश्चिमात्यकरण आले आहे ते येणारी नवीन पिढी पुसून काढणार असून जुन्या संस्कृतीचा अमल पुन्हा सुरू होणार आहे.

भगवान महावीर यांच्या जन्म कल्याणक दिनी जे नामोसमरण होईल त्यामुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन लोक चांगल्या विचाराने प्रेरित होऊन दुसऱ्याचा वाईट विचार त्यागतील तसेच शांती व बंधूता अबाधित राहण्यासाठी लोक एकत्र येतील, असा विश्वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला.



## धाटाव येथील सामाईक जलशुद्धीकरण केंद्रात आग

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील सामाईक जलशुद्धीकरण केंद्रात रविवारी (दि. २१) सकाळी ११च्या सुमारास आग लागली. सुदैवाने या आगीवर वेळीच नियंत्रण मिळवल्यामुळे अनर्थ टळला.

जलशुद्धीकरण केंद्राच्या टाक्यांमध्ये पाणी सोडणाऱ्या पाईपलाईनसह बाजूला साठवून ठेवलेले पाईप आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. धाटाव अग्निशमन केंद्राचे अधिकारी हरेश्वर पाटील व त्यांच्या जवान तातडीने घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.



धाटाव औद्योगिक वसाहती मधील सर्व कारखान्यांचे रासायनिक पाण्यावर सामाईक प्रक्रिया केंद्रात पूर्ण प्रक्रीया करून ते पुढे खाडीत सोडण्यात येते. रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनच्या अखत्यारीखाली हे केंद्र आधी चालवण्यात येत होते. आता हे केंद्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धाटाव उपविभागाच्या देखरेखीखाली एका खासगी एजन्सी मार्फत चालवण्यात येत आहे.

येथील रासायनिक पाणी साठवण टाकीच्या बाजूला रविवारी सकाळी आग लागली. या आगीत साठवण टाकीत पाणी सोडणाऱ्या पाईपांसह बाजूला ठेवलेले एचडीपीई पाईपांनी पेट घेतला. आगीचे कारण मात्र स्पष्ट झाले नाही.

याची माहिती मिळताचा धाटाव अग्निशमन केंद्राचे जवान घटनास्थळी दाखल होत त्यांनी त्वरित आगीवर नियंत्रण मिळविले, मात्र सामाईक प्रक्रिया केंद्रात आग प्रतिबंधक कोणतीही यंत्रणा वा पाण्याचे हायड्रंट नसल्यामुळे बाजूला असलेल्या एक्सल कंपनी मधून पाणी घेत अग्निशमन जवानांना आग विझवावी लागली.

या आगीबाबत एमआयडीसीचे उपविभागीय अभियंता गिते यांचेशी संपर्क साधला असता मी आता बाहेर आहे. घटनास्थळी गेल्यानंतर आगीचे कारण व झालेल्या नुकसानीबाबत माहिती देतो, असे त्यांनी सांगितले, तर सामाईक केंद्र चालवणाऱ्या एजन्सीचे व्यवस्थापक हिमांशु हेदेखील त्यांच्या खासगी कामासाठी बाहेर असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या आगीचे नेमके कारण काय हे समजण्यास वेळ लागणार आहे.

## एक्स्प्रेस वेवर कार अपघातात पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर रविवारी (दि.२१) रात्री ३ वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगात जाणारी इर्टिगा कार लोखंडी रेलिंगमध्ये घुसल्याने भीषण अपघात झाला या अपघातात मुंबईतील पोलीस उपनिरीक्षक सुरज रामचंद्र चौगुले (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला, एक्स्प्रेस वेवरून इर्टिगा कार (एमएच ४३ -सीजी ८९८८) घेऊन पोलीस उपनिरीक्षक सुरज चौगुले पुण्याहून मुंबईकडे जात असताना पनवेल हद्दीत चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारने बाजूच्या लोखंडी रेलिंगला जोरदार धडक देऊन ती रेलिंगमध्ये घुसून भीषण अपघात झाला. या अपघातात सुरज चौगुले यांच्या छातीत गंभीर दुखापत होऊन मृत्युमुखी पडले.



या अपघाताची माहिती मिळताच पळस्पे वाहतूक पोलीस, देवदूत यंत्रणा, आयआरबी, यंत्रणा, देवदूत यंत्रणा, पोलीस निरीक्षक काळभोर, खांदेश्वर सहाय्यक पोलीस निरीक्षक पिसाळ, सुषमा पाटील, खैरनार, पनवेल तालुका पोलीस स्टाफ, खांदेस्वर पोलीस स्टाफ आदी हजर होते. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहन बाजूला घेऊन एक्स्प्रेस वे वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

# भातसई येथील महादेवी मातेची आज पालखी, उद्या यात्रा

### दोन दिवस होणार गजर, भाविकांची मांदियाळी



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात ठिकठिकाणी जत्रा, यात्रा उत्सवाला सुरुवात होत असताना तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या भातसई येथील महादेवी मातेचा पालखी उत्सव २२ एप्रिल रोजी होत असून मुख्य यात्रा २३ एप्रिलला होणार आहे. या पालखी व यात्रेची जय्यत तयारी सुरू आहे.

दोन दिवस भातसई येथील परिसरात महादेवी मातेचा गजर होणार असून मंदिरात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मातेच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह राज्यातील भाविक भातसई येथे दाखल होणार आहेत.

रोहा तालुक्याला आध्यात्मिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. याची साक्ष आजही तालुक्यातील प्राचीन मंदिरे देत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या अवचितगडाच्या पायथ्याशी अनेक पुरातन मंदिरे आहेत. त्यातीलच एक भातसई येथील महादेवी माता मंदिर होय.

रोहा-अलिबाग मार्गावरील भातसई गावात देवीचे मंदिर असून रोह्यापासून सहा किमी अंतरावर, तर नागोठण्यापासून १४ किमी अंतरावर हे गाव आहे. निडी रेल्वेस्थानकात उतरल्यावर काही अंतरावर महादेवी मातेचे मंदिर आहे.

भातसई हे निसर्गाच्या कुशीत वसलेले टुमदार गाव. महाराष्ट्रात जी आदर्श गावे नावारूपास आली त्यातीलच एक भातसई. गावातील श्री महादेवीचे जागृत देवस्थान आहे. या देवस्थानची जुनी अख्यायिका सांगितली जाते. गावातील गुराखी आपल्या गुरांना चारण्यासाठी घेऊन गेला असता एका करवंदीच्या झुडपापाशी त्याला अवतरलेली देवी दिसली. नंतर ती अदृश्य झाली, परंतु मग ही श्री महादेवी माता सध्याच्या देवळाजवळ एका माळावर स्वयंभू देवीच्या रूपाने प्रकट झाल्याचे सांगितले जाते.



पुढे या देवीला महादेवी असे ओळखू लागले. पूर्वी भातसई व आजूबाजूच्या गावात रोगराई संकटकाळी रक्षण करण्यासाठी मध्यरात्रीच्या सुमारास महादेवी आपला भाऊ श्री धावीर महाराज यांच्याबरोबर फिरत असत असे ग्रामस्थ सांगतात.

मूळ देवी पूर्वी भवानी म्हणून ओळखली जायची. श्री महादेवीचे १९०७ साले नवीन मंदिर गावकऱ्यांनी श्रमदानातून बांधले. ही देवी खरीवले घराण्यातील भक्तगणांच्या अंगात संचारत असते. ही प्रथा अद्याप सुरू आहे. मध्यंतरी शासनाने ही परंपरा (सुमारे सन १९५०) बंद करण्याचे ठरवल्यानंतर कार्यक्रम ठिकाणी गावात पोलीस आले होते. या वेळी महादेवीचा साक्षात्कार झाल्याने ही परंपरा बंद न पडता पुढे आजपर्यंत चालू आहे.

चैत्र पौर्णिमेच्या आदल्या दिवशी देवीची आरास केली जाते. दिमाखदार पारंपरिक वाद्यवृंदावर पालखी काढली जाते. ही पालखी संपूर्ण भातसई, कोपरा, झोळांबे, लक्ष्मीनगर आदी पंचक्रोशीतील गावांमध्ये ढोल ताशाच्या गजरात फिरवली जाते. या वेळी विद्युत रोषणाई, पताका व घराला रंगरंगोटी करून सजवलेले असते. सुंदर अशा रांगोळ्या घरासमोर महिलावर्गाने काढलेल्या असतात. पालखी आल्यावर पूजन केले जाते. भाविक पालखीचे दर्शन घेतात. संपूर्ण परिसरात उत्साह दिसून येते.

यात्रेच्या दिवशी परिसरातील महादेवाच्या काठ्या तसेच ताशा, खालुबाजा या पारंपरिक वाद्यावृंदावर गळ टोचणी या मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणी मंदिरात येतात. गळ टोचणीचा कार्यक्रम हा या यात्रेचे मुख्य आकर्षण आहे. गळ टोचून घेणारा भक्त त्या रात्रीपासून उपवास करतो. जत्रेच्या प्रमुख विधीला येथूनच सुरुवात होते. श्री महादेवीचा गळ टोचून घेण्याचा मान पंचक्रोशीसह महाराष्ट्रातील सहा भक्तांना दिला जातो. गळ टोचून घेण्यापूर्वी गळ टोचून घेणारा भक्त व त्याचे कुटुंबातील व्यक्ती देवी जवळ मनोभावे प्रार्थना करतात.

श्री महादेवी मंदिराच्या पटांगणात सुमारे २० फूट उंचीचा सिमेंट काँक्रीटचा स्टेज बनवला आहे. मानकरी मंडळी गळ टोचून घेणाऱ्या भक्ताला शिडीवर चढवून मुख्य ठिकाणी आणतात. या ठिकाणी मधोमध सुमारे पाच फूट उंचीच्या खांबावर आडवा २० फूट खांब वर्तुळात समांतर बसविलेला आहे. त्यास लाट असे म्हणतात. हे लाट जमिनीपासून २५ फूट उंचावर आहे. दोन टोकांना दोरखंड बांधून ते जमिनीकडे सोडलेले असतात. दोरखंड धरून लाट फिरवण्यासाठी दोन्ही बाजूस एक ते दोन माणसे व भक्तजन असतात. लाटेच्या एका टोकाला गळाला असलेला दोर बांधला जातो. या वेळी लाटेवर भगत बसतो. त्यानंतर पूर्ण तयारी झाली की एक जण हर हर हर महादेव अशी हाक देतो. तेव्हा गळ टोचून घेणाऱ्या व्यक्तीस अधांतरीत उचलले जाते. येथील लाट फिरवली जाते. गळ टोचून घेणाऱ्या भक्तास गळाला बांधलेल्या दोरीने टांगून घेऊन अधांतरी लोंबकळत्या अवस्थेत ठेवतात. पूर्वी पाच फेऱ्या फिरविल्या जात होत्या. आता फक्त एकच फेरी फिरवली जाते.

नवरात्रीमध्ये नऊ दिवस श्री महादेवीचा जागर केला जातो. पंचक्रोशीतील ग्रामस्थ या जागरणानिमित्ताने आपली सेवा रूजू करतात. या नऊ दिवसांत भजन, कीर्तन यासह विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजिले जातात.

भातसई येथील श्री महादेवी मातेच्या मंदिर परिसरात यात्रेच्या दिवशी लहान मुलांची खेळणी, विविध जीवनापयोगी वस्तू, खाद्यपदार्थांसह अनेक दुकाने थाटली जातात. या दुकानातून यात्रेनिमित्ताने आलेले लोक खरेदी करतात. लहान मुलांसह तरुण व महिलावर्ग यात्रेत मनसोक्त फिरत खरेदी करीत असतात.

# प्रचाराचा झंझावात









पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना भरघोस मतांनी विजयी करण्यासाठी पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागासह शहर परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार प्रचार सुरू आहे. या अंतर्गत भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी आसूडगाव येथे प्रचार करण्यात आला. या वेळी तालुका सरचिटणीस व माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शशिकांत शेळके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.















पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना विजयी करण्याचे आवाहन नवीन पनवेल येथे प्रचारादरम्यान करण्यात आले. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, भाजपचे वॉरियर्स जगदीश घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जीवेत् शरदः शतम्!

**अनिल कोकाटे**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

दीपक दुर्गे

जीवेत् शरदः शतम्!

**सुशांतकुमार बलीयारासीन**


यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा




शुभेच्छुक

भागभत्ता स्वान



ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।।
जेणे निगमवल्ली प्रगट केली।।




विठ्ठल रुख्मीणी तुम्ही
अखंड आणा ध्यानी।।

वर्ष १९ वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।।१।।
ज्ञान होय अज्ञानासी । ऐसा वर त्या टीकेसी ।।२।।
ज्ञान होय मूढा । अति मूर्ख त्या दगडा ।।३।।
वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ।।४।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम
नाम घेता कापे यम।।

माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

वै ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (कोपर) यांच्या उपस्थितीत

## अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

**देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.**

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

दै नं दि न  का र्य क्र म

पहाटे ४.०० ते ६.०० वा. -काकडा
सकाळी ८.३० ते १२.०० वा. -ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. -प्रवचन

सायं. ६.०० ते ७.०० वा. -सामुदायिक हरिपाठ
रात्री ७.३० ते ९.३० वा. -किर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | किर्तन (रात्री ७.३० ते ९.३०) |
|---|---|---|
| सोमवार (दि. २२/०४/२०२४) | ह.भ.प. रोशन महाराज (बेलपाडा) | **ह.भ.प. बाळ श्री राम होजगे महाराज** (राजगुरुनगर-पुणे) स्व. प्रभावती बाळकृष्ण भगत व ह.भ.प. स्व. वत्सला रमाकांत भगत यांच्या स्मरणार्थ सौजन्य: ह.भ.प. रमाकांत काशिनाथ भगत (शेलघर) |
| मंगळवार (दि. २३/०४/२०२४) | ह.भ.प. गोपीनाथ महाराज (जासई) | **ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे** (गणेगाव, कर्जत) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| बुधवार (दि. २४/०४/२०२४) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | **ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे** (संगमेश्वर, जिल्हाध्यक्ष, वारकरी साहित्य परिषद अ.नगर) कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| गुरुवार (दि. २५/०४/२०२४) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | **सदगुरु कृपांकित ह.भ.प. श्री. जयेश महाराज भाग्यवंत** (श्रीमलंगगड) सौजन्य : श्री. सुधीर तुलशिदास ठाकूर (खारकोपर) |
| शुक्रवार (दि. २६/०४/२०२४) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | **ह.भ.प. दिपक महाराज देशमुख** (विश्वस्त श्री आगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| शनिवार (दि. २७/०४/२०२४) | स. ८.३० वा. -ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन सायं. ४ ते ५वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | **ह.भ.प. युवराज काका महाराज देशमुख** (आळंदी देवाची) कै. गिताबाई त्रिबंक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |

काल्याचे किर्तन रविवारी दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते १२ वा.
भागवताचार्य ह.भ.प. प्रविणजी महाराज पवार (संभाजीनगर)
कै. महेश रघुनाथ घरत यांच्या स्मरणार्थ सौजन्य : श्री. सचिनशेठ रघुनाथ घरत (शेलघर)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com